# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | **:** | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| **संस्थापक** | **:** | **गुंडोपंत, हरिभक्त** |
| **संपादक** | **:** | **डॉ. विजय वा. बेडेकर** |
| **प्रकाशक** | **:** | **अनंत विनायक धोरे** |
| **प्रकाशन वर्ष** | **:** | **२०१९** |
| **वर्ष** | **:** | **चौप्पन्नावे** |
| **अंक** | **:** | **पहिला** |
| **पृष्ठे** | **:** | **३२ पृष्ठे** |

**गणपत्रिका  विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

## गणपत्रिका  निर्मिती वर्ष : २०१९

## गणपत्रिका  क्रमांक      :  १९९

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : चोप्पन्नावे अंक : पहिला फाल्गुन १९४० / चैत्र १९४१ एप्रिल २०१९

## *संपादकीय*

### विज्ञान आणि धर्म

विज्ञान आणि धर्म एकमेकांना 'तारक' की 'मारक', हा तसा चर्चेचा जुना विषय.

खरं म्हणजे हा विषय पाश्चिमात्य जगतामध्ये १६ व्या शतकानंतर जास्त चर्चेत येऊ लागला. आजही ही चर्चा दोन्ही क्षेत्रातील अभ्यासकांमध्ये गांभीर्याने होताना दिसते. जागतिक स्तरावरचा विचार केला तर, यामधला 'धर्म' म्हणजे प्रामुख्याने ख्रिश्चॅनिटी आणि इस्लाम, आणि 'विज्ञान' म्हणजे, पाश्चात्य देशामध्ये प्रबोधन क्रांतीनंतर विकसित झालेले विज्ञान.

कुठल्याही सभ्यतेमध्ये, किंवा समाजामध्ये सामाजिक मूल्य, किंवा नीति-अनितीच्या कल्पनांवर त्या त्या संस्कृतीमधील धर्मकल्पनांचा पगडा असतो. युरोपमधीलही संस्कृती त्याला अपवाद नव्हती. युरोपच्या इतिहासामध्ये 'मध्ययुगीन' काळ म्हणजे ५ वे शतक, रोमन साम्राज्याचे पतन ते १५ वे शतक, प्रबोधन युगाची सुरुवात, हे अंधःकार युग (Dark Age) समजले जातं. या कालावधीमध्ये आज आपण ज्याला विज्ञान म्हणतो; अशी कुठलीच निर्मिती तेथे होत नव्हती. भौतिक व अधिभौतिक व्यवहार हे ॲरिस्टॉटल, टॉलेमी व बायबलकेंद्रित होते. सहाजिकच या परिघाबाहेर जीवनाच्या कुठल्याच क्षेत्राचा विचार होत नव्हता. बाबीलोनियन व मेसोपोटमियन संस्कृत्या टिग्रीस व यूफ्रेटिस नदीच्या परिसरात विकसीत झाल्या होत्या. इस्लामपूर्व इराक, सिरिया, टर्कीचा काही भाग व सौदी अरेबिया हे सर्व या विकसित संस्कृतीचे भाग होते. इराणमध्ये झरथ्रुस्ट्र पंथ होता. या सर्व संस्कृत्यांचे ग्रीक आणि हिंदू विज्ञान, आणि धर्म विचारांशी आदानप्रदान होत होते. इराणमधील गुंडीशापूर या गावी इसवीसनाच्या ५ व्या शतकातच पंचतंत्रासारखा ग्रंथ पहेलवी भाषेत भाषांतरीत झाला होता. याचबरोबर अनेक हिंदू

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१. इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने कार्यालय बंद आहे. कृपया टपाल व मनीऑर्डर्स पाठवू नये.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), कामे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| कालभैरवाष्टकम्। | ५ |
| गीतकृष्णायन-भाग ५- कुरूक्षेत्र | ७ |
| ''दुःखाच्या प्रत्येक वळणावर सुखाच्या सावलीचे चिंतन'' | ९ |
| भारतीय जीवन-चिंतन आणि तंत्रज्ञान | १७ |
| नीतिकथा | २० |
| ज्ञानोबांच्या उत्तुंग कवि-कल्पनेचा एक मासला | २२ |
| राजाची व्यक्तिगत सुरक्षा | २६ |



**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि रु. ५
३) हरितालिका पूजा विधि रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) रु. १०
६) तुलसी विवाहविधि रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५
(या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी रु. ४०
१३) गंगालहरी रु. २५
१४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण रु. ३०
१५) सांख्यदर्शन रु. ३०
१६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) रु. १५


- या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
- या त्रैमासिकातील मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय कोणीही कुठेही छापू नये.
- मनीऑर्डरने पैसे पाठविताना मनीऑर्डर फॉर्मवर आपला मोबाईल क्रमांक लिहावा म्हणजे संपर्क करणे सोपे पडते.
- सद्धर्माच्या लेखकांनी त्यांचा लेख इतर ठिकाणी पाठविणे असल्यास तो सद्धर्माच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे असा उल्लेख करावा.

**- संपादक**

परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील व दी.का. देणगीदारांची नावे अपरिहार्य कारणामुळे पुढील अंकात देण्यात येईल. **– संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३८ वा

**अयं गण्डस्योपरि पिट्किा संवृत्ता।**[४१३]

आता हा दुष्काळात तेरावा महिना

**अद्य कपोतः न श्वो मयूरः**[४१४]

Half a loaf is better than no bread.

**दारिद्र्यदोषो गुणराशीनाशी।**[४१५]

अनेक गुण अंगात असूनहि दारिद्र्यामुळे माणसाची पिछेहाट होते.

पुर्ण सुभाषित :

**एकोऽहि दोषो गुणसं निपातेः**
**निमज्जतीन्दोरिति यो बभाषे।**
**नूनं न दृष्टंकविनापि तेन**
**दारिद्र्यदोषा गुणराशीनाशी।।**

कवीने विधान केले की माणसाच्या अंगात अनेक गुण असतील (गुण संनिपाते) तर एखादा दोष सहज झाकला जातो. जसे चन्द्रावर कलंक आहे, पण त्या कविच्या लक्षात आले नाही की दारिद्र्यासारखा एखादाच दोष असेल तर तो सर्व गुण नाहीसे करून टाकतो. त्यातून तो डोके वर काढू शकत नाही.

**नीचैर्गच्छति उपरि च दशा चक्रनेमिक्रमेण**[४१६]

पहिली ओळ : कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा?

जीवनात सुखदुःखांचे ताण्डवनृत्य सतत चालूच असते. चाकाचे आरे कधी वर जातात व पुढच्या क्षणाला ते खालीपण येतात. (चक्र-नेमी-क्रम) हे चालणारच.

**अल्पविद्यो महागर्वी।**[४१७]

उथळ पाण्याला खळखळाट फार. या विषयी भर्तृहरीचा श्लोक प्रसिद्ध आहे.

**यदा किञ्चितज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं**
**तदा सर्वज्ञोऽस्मित्यभवदवलिप्तं मम मनः।**
**यदा मन्मूर्खत्वं बुधजनसकाशादवगतं**
**तदा शीघ्रं शीघ्रं ज्वर इव मदो मे व्यपगतः।।**

जेव्हा माझ्याजवळ थोडे ज्ञान होते (किञ्चित् ज्ञः) तेव्हा एखाद्या माजलेल्या हत्ती सारखा मला गर्व चढला होता. तेव्हा मी 'सर्वज्ञ' आहे असे मला वाटू लागले होते. पण जेव्हा मी विद्वानांच्या सहवासात हळूहळू गेलो तेव्हा चटकन माझ्यातला अहंकार ताप उतरावा तसा पटकन निघून गेला व मला कळले की मी मूर्ख आहे. (शिखरिणीवृत्त. चाल कळावी म्हणून वृत्तचा उल्लेख.)

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

## कालभैरवाष्टकम्। 

दि. दा. औटी

**(शब्दार्थ, अन्वय, समास, अनुवाद, वृत्त)**

सद्धर्म जाने. २०१९ पृष्ठ १७ वरील अष्टक वाचले आणि समास प्रचूर स्तोत्र वाचून लेखनीय वाटले म्हणून हा प्रपंच.

**देवराज सेव्य मान पावनांध्रिपङ्कजं**
**व्यालयज्ञसूत्रमिन्दुशेखरं कृपाकरम्।**
**नारदादियोगिवृन्द वन्दितं दिगंबरं**
**काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे।।**

शब्दार्थ : देवराज, देवानां राजा देवराजः ष. तत्पु. इन्द्र.

सेव्यमान - सेव् १ आ.प. कर्तरि व.का.धा.वि. सेवा केलेला.

पावन - (वि.) पवित्र झालेला

अङ्घ्रि - (पुं.) पाय

पङ्कजम् -(नपुं.) कमळ, पङ्के जातम्। पङ्कजम् उप. तत्पु.। शब्दशः चिखलात जन्मलेले (पङ्क - चिखल)

इथपर्यंत १५ अक्षरांचा एक पाद आहे. व तो संपूर्ण पाद 'समास' आहे. पाहा.

अङ्घ्रि : पङ्कजम् एव - अङ्घ्रिपङ्कजम् रुपक क.धा.। पाय हेच कमळ पावनम् अङ्घ्रिपङ्कजम् पावनांघ्रि-अङ्घ्रिपङ्कजम् क.धा.। देवानां राजा देव-राजः ष.तत्पु.। तेन सेव्यमानम् देव-राजसेव्यमानम् तृ. तत्पु.।

देवराजसेव्यमानं पावनांघ्रिपङ्कजम् देव-राजसेव्यमानपावनांघ्रिपङ्कजम् क.धा.।

इन्द्राने सेवन केलेले पवित्र पदकमल ज्याचे आहेत (अशा त्या शंकराला)

पाद २ रा : शब्दार्थ - व्याल - सर्प

इन्दु - (पुं.) चन्द्र, शेखर - मस्तक

इन्दुः शेखरे यस्य सः इन्दुशेखरः बहु. तम् इन्दुशेखरम् - ज्याच्या मस्तकावर चन्द्र आहे अशा (शंकराला मी भजतो -)

व्यालयज्ञ - व्यालानां यज्ञः व्यालयज्ञः षःतत्पु.। सर्पयज्ञ. व्यालयज्ञस्य सूत्रम् व्यालयज्ञसूत्रम ष.तत्पु.। सर्पयज्ञाचा सूत्रधार. व्यालयज्ञसूत्रम् इन्दुशेखरम् व्यालयज्ञसूत्रमिन्दुशेखरम् - क.धा.। जो सर्पयज्ञाचा सूत्रधार आहे व ज्याच्या मस्तकावर चन्द्र आहे (अशा चन्द्र शेखराला मी भजतो)

जन्मेजय हा अर्जुनाचा पणतू व परिक्षिताचा मुलगा. परिक्षिताला सर्पाने दंश करून ठार केले म्हणून जन्मेजयाने सर्पकुलाचा समूळ नाश करण्यासाठी सर्प सत्र केले. त्यात सर्व सापांचा संहार झाला. मात्र आस्तिक ऋषींच्या मध्यस्थीमुळे तक्षक तेवढा वाचला व आस्तिकाच्या सांगण्यावरुन जन्मेजयाने सर्पसत्र थांबविले.

कृपाकरम् - कृपां करोति सः इति वा। उपपद तत्पु.। कृपाकरणारा.

पाद ३ राः- नारदादि - नारदः आदौ येषां ते बहु.। नारद इत्यादी. योगिवृन्द-योगिनः वृन्दः योगिवृन्दः ष तत्पु.। योगिवृन्देन वन्दितं योगिवृन्दवन्दितम् तृ.तत्पु. किंवा नारदादयः योगिवृन्दः नारदादियोगिवृन्दः तेन वन्दितम्। नारद इत्यादि योगी समुहाने ज्याचे वंदन केले आहे अशा दिगंबराला (मी भजतो).

दिगंबर- दिक् दिशा, अंबर-वस्त्र.
दिगेव अम्बरं यस्य सः दिगम्बरः
दिशा हेच ज्याचे वस्त्र आहे (कौपिनेश्वर-कौपिन-लंगोटी)
पाद ४ था :- काशिका इति पूरम् का-शिकापूरम्-विशेषनाम सामान्यनाम क. धा. अधिनाथ - अधिगतः नाथः अधिनाथः मालक. काशिकापुरस्य अधिनाथः-काशिकापुराधिनाथः षःतत्पु. 'भै' इति रवः (रव-शब्द) यस्य सः भैरवः - भयानक आवाज असलेला. कालस्य भैरवः कालभैरवः ष.तत्पु. किंवा कालस्य रवः इव रवः यस्य सः। काल-मृत्यू, यम याच्याप्रमाणे ज्याचा भयंकर आवाज आहे (अशा त्याला).
विशेष लक्षात घ्यावे की श्लोकातील मुख्य वाक्य 'अहं भजे' असे आहे. त्यामुळे क्रियापदाशी संबंधीत सर्व ठिकाणी कालभैरवाची विशेषणे द्वितीया विभक्तीत योजली आहेत.
अन्वयः - अहं देवरान ... कालभैरवं भजे। मध्ये सगळी द्वितीयान्त विशेषणे

भावार्थ : देवांचा राजा इन्द्र याने ज्याच्या पवित्र आणि कमळरुपी पायाची सेवा केली आहे, यज्ञाचा सूत्रधार, ज्याच्या मस्तकावर चन्द्र आहे व जो कृपा करणारा आहे, नारद इत्यादी योगी समुह ज्याचे वन्दन करतो, ज्याने दिशा हेच वस्त्र परिधान केले आहे, काशिकापुराचा जो मालक आहे अशा काळभैरवाला मी स्मरतो. (श्लोकात एकच क्रियापद आहे. भज्१ आ.प. उत्तम पुरुष ए.व.)
वृत्त - तूणिकम् - व्याख्या - तूणकं समानिकापदद्वय विनान्तिमम्।
अर्थ - समानिका वृत्ताचे जे दोन गण आहेत (र आणि ज) तसेच दोनदा तूणकामध्ये आहेत र ज र ज पण शेवटचा गण समानिका वृत्तासारख नाही. तो 'र' गण आहे सारांश तूणिक वृत्ताचे र ज र ज र असे ५ गण आहेत व प्रत्येक पादात १५ अक्षरे आहेत. ह्या वृत्तातली यती ७, ८ अशी आहे. हे अक्षरगणवृत्त असून समवृत्त आहे.

वृत्ताची छाननी तूणिकम्।

| | र गण<br>SIS | ज गण<br>ISI | र गण<br>SIS | ज गण<br>ISI | रगण<br>SIS |
|---|---|---|---|---|---|
| पाद १ ला | देवरा<br>SIS | जसेव्य<br>ISI | मानपा<br>SIS | वनांघ्रि<br>ISI | पङ्कज<br>SIS |
| पाद २ रा | व्यालय<br>SIS | ज्ञसूत्र<br>ISI | मिन्दुशे<br>SIS | खरंकृ<br>ISI | पाकरं<br>SIS |
| पाद ३ रा | नारदा<br>SIS | दियोगि<br>ISI | वृन्दव<br>SIS | न्दितंदि<br>ISI | गंबरं<br>SIS |
| पाद ४ था | काशिका<br>SIS | पुराधि<br>ISI | नायका<br>SIS | लभैर<br>ISI | वंभजे<br>SIS |

**दि. दा. औटी**

‘दुर्योधन वध’ – जाती वनराज

रसिका येउन बघ युद्धमार्गिचे दुष्परिणाम स्वतःच
या कुरुक्षेत्रावर मृत्युदेवता करते तांडव नाच ।।धृ।।

त्या उजाड क्षेत्रावरती
पडती जे धारातीर्थी
रुदन आप्त त्यांचे करती
लागते रणाची अतीतीव्र ती सकल जनांना आच ।।१।।

वधले सारेजण जाता
ना उरे एकही त्राता
वा दुर्योधनास भ्राता
क्षणभरीच त्यासहि वाटे केले आपण युद्ध उगाच ।।२।।

होता हतबल कौरव तो
मग रणास सोडुन लपतो
आश्रया जलाशयि जातो
पण सर्प डिवचता कोण सोडती त्या सर्पास असाच ।। ३ ।।

देती पांडव आव्हाने
शेवटीच निरुपायाने
दुर्योधन ये वेगाने
म्हणतो दाविन मी आज तुम्हाला जेता कोण खराच ।। ४ ।।

द्या भीम म्हणे मज आज्ञा
वधण्यास दुष्ट या अज्ञा
करतो मी पूर्ण प्रतिज्ञा
अपमानांची दुष्कृत्यांची देउ दे कुकर्म्या पोच ।।५।।

मग दुर्योधनही बोले
क्षतविक्षत ना तुज केले
पुतळ्यास तुझ्या जे झाले
तेरा वर्षे मी सराव करता त्यासमवेत बराच ।।६।।

भिडला पणा लाउन बल
तो युद्धामाजी कुशल
पण भीम असे अति प्रबल
पाहण्यात येते असे थरारक गदायुद्ध विरळाच ।।७।।

निर्णायक ते ना होई
तव आठव श्रीहरि देई
भीमा अंकासी पाही
ज्या भंगण्यास तू केली असशी घनघोर प्रतिज्ञाच ।।८।।

ऐकता हरीच्या वचना
बहु स्फुरण चढे भिमसेना
ज्या बळास नाही तुलना
घाली दुर्योधन अंकावर तो घाव असा बुद्ध्याच।।९।।

कोसळता कौरवराज
संपले युद्ध हे आज
जैसा जेता वनराज
युद्धोत्तर तैसा भीमसेन करि भयकारि गर्जनाच ।।१०।।

कुरूक्षेत्रावर निष्प्राण अवस्थेत अखेर दुर्योधन कोसळला आणि युद्ध संपलं! पांडवांचा विजय झाला, कौरवांचा सर्वनाश झाला!

भीमानं आपल्या पट्टशिष्याचा प्राण कमरेखाली घाव घालून घेतल्याचं पाहून बलरामाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. गदा घेऊन तो भीमावर धावून जाणार तेवढयात कृष्णानं त्याच्या कमरेला विळखा घालून त्याला थोपवलं आणि तो समजावणीच्या स्वरात म्हणाला, अरे दादा, भीमानं आपल्या प्रतिज्ञापूर्तीसाठीच हे केलं बरं.

निरुपायानं गदा परत खांदयावर टाकत बलराम म्हणाला, कृष्णा, तूच बोलतो आहेस म्हणून. पण अधर्म नष्ट करायला कधी कधी वाममार्गाचाही स्वीकार करावा लागणं हे कलियुगच सुरू झाल्याचं लक्षण आहे असं मी समजतो. त्यानंतर लगेचंच बलराम कुरूक्षेत्र सोडून निघून गेला.

अठरा दिवस सतत लखलखणारी शस्त्रं अखेर आता म्यान होत आहेत. खिंकाळणारे घोडे आणि चित्कारणारे हत्ती आता शांत झाले आहेत. विजयी गांडीव खांदयावर पुनश्च लटकावून अर्जुनही आपल्या रथातून उतरू पहातो आहे. पण तसं करण्यापूर्वी कृष्ण रथातून उतरण्याची तो नम्रतेनं वाट पहातो आहे.

कृष्णाच्या ते लक्षात आल्यावर गंभीरतेनं तो अर्जुनाला म्हणाला...

**'रथत्याग'**

युद्ध संपता कृष्ण म्हणाला सावधान व्हावे
पार्था तू मजआधी अपुल्या रथास त्यागावे ।।धृ।।

अठरा दिन या कुरुक्षेत्रावर
आयुधांस वर्षिले रथावर
शत्रूने एका हेतूने तुजला मारावे ।।१ ।।

दुष्टांचे त्या अनिष्ट चिंतन
रथा घेरते होऊन कुंपण
कुपरिणाम त्या कुविचारांचे तू नच भोगावे।।२।।

असता मी या रथा सारथी
अशक्य कोणी तुला मारती
माझ्या योगे काट्यांचेही मृदुल सुमन व्हावे ।।३।।

उतरताच मी रथास त्यागुन
शस्त्रांघाते जाइल भंगुन
वाटे जर त्या संकटातुनी आपण वाचावे ।।४।।

कुरूक्षेत्रावर अठरा दिवसात अठरा अक्षौहिणी सैन्याचा नाश झाला. आपले सर्व पुत्र मारले गेल्याचं कळताच शोकविव्हल धृतराष्ट्र गांधारीसह रणांगणावर आला. त्यांच्याबरोबर अश्रूपातानं म्लान झालेली कुंतीही आली. खिन्न पांडव त्यांना सामोरे गेले. युधिष्ठिरानं पुढे होऊन धृतराष्ट्राला प्रणाम केला. त्याच्या मागोमाग भीमही तसंच करणार तेवढयात कृष्णानं त्याला मागे ओढून दुर्योधनानं तेरा वर्षं ज्या भीमाच्या पुतळयाबरोबर गदायुद्धाचा सराव केला होता तो पुतळा पुढं केला. धृतराष्ट्रानं त्या पुतळयाला बाहुपाशात बद्ध करून एवढया जोरानं कवटाळलं की तो लोखंडाचा पुतळाही चेपून गेला आणि खुद्द धृतराष्ट्रही रक्त ओकू लागला!

(पृष्ठ २१ वर)

## ''दुःखाच्या प्रत्येक वळणावर सुखाच्या सावलीचे चिंतन''

**वसंत गोडबोले**

सुख आणि दुःख मानवी जीवनाच्या वाटचालीचे अक्षय सोबती, जीवनाचे अविभाज्य प्रतिक्षणाचे घटक. मानवी जीवन म्हणजेच सुख+दुःख यांची बेरीज असे जरी कल्पिले तरी बहुतांशी योग्यच. काही अपवाद वगळता सर्व सामान्यतः हेच सूत्र लागू पडते आपल्या आयुष्याला. अर्थात काही वेळा आपण पहातो की काही मानवांचे जीवनात सुखच असते तर काहींच्या केवळ दुःखच. बहुतांशी जणांचे जीवन मात्र सुख आणि दुःख यांचे संयुग असते. प्रत्येक क्षण कसा येइल सुखाचा / दुःखाचा याचा अंदाजही करता येणार नाही. माझ्या 'क्षण' या कवितेत मी यासंबंधी एक कडवे लिहिले आहे ते असे.

**''स्वरुप क्षणाचे आकळेना,**
**देई सौख्य वा देई वेदना।**
**क्षण नाण्याची फेक नियतीची,**
**चितपट कैसी कधी कळेना।।''**

तेव्हा जीवनाचा प्रत्येक क्षण कसा सामोरा येईल ते समजणे कठीणच. आता हे खरे की मानवी जीवनांत दुःखाचा मोठा वाटा असतो व सुखाचा अतिशय कमी. सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वता एवढे, एक धागा सुखा, शंभर धागे दुःखाचे आदिंमधून हेच प्रतीत होते की सुख आणि दुःखाचे गुणोत्तर अत्यल्प असते. तर दुःख आणि सुख यांचे गुणोत्तर फार मोठे असते आणि म्हणूनच की काय जीवनाच्या संग्रामात एक आव्हान आहे - दुःख पचविण्याचे व सुख समाधानाने घेण्याचे. जन्मापासूनच सुख आणि दुःखाचे गणित जीवनाच्या पाटीवर नियति लिहू लागते. आपला जन्मसुद्धा जन्मदात्यांच्या जीवनांत सुख वा दुःखाचा क्षण असतो. तसेच आपला मृत्यु देखील. यामध्ये जे आयुष्यदान नियतीने दिले जाते त्यात सुख क्षण शोधणे म्हणजे काळ्या उडिदामाजी पांढरा उडिद शोधणे होय. सुख आणि दुःख या मनाच्या संकल्पना आहेत आणि काम, क्रोध, मद, मोह, माया, मत्सर या षड्रिपूंच्या जाळ्यांत अडकलेले मन त्या संकल्पनांचे जनक आहे आणि सुख व दुःख भोगावे लागते शरीराला कारण मनाचे व्यावहारिक प्रगटीकरण शरीराच्या माध्यमातून होते. तेव्हा हे स्पष्ट आहे की मन जर खंबीर असेल तर सुख व दुःखाचा हा कल्प सहज पचविता येतो. जीवनाचा ताजवा हा असा सुख आणि दुःख यांच्या पारड्यांमुळे सतत हेलकावे खात असतो. जीवन हा जर एक प्रवाह कल्पिले तर त्याचे प्रवहन कसे होते. कशी वळणे घेते व कुठे धाव संपते ते कळणे शक्य नाही. या सुख, दुःखाच्या संकल्पनेत त्याचे मन स्थिर राहते म्हणजेच सम राहते ते व्यक्तिमत्व योगी मानवाचे असते. सुख दुःखे समत्कृत्वा, लाभालाभौः जयाजयौः हे श्रीमद भगवद्गीतेतील वचन योगी पुरुषाचे लक्षण दाखविते. आपण या लेखात विचार करणार आहोत तो सामान्य माणसांचा ज्यांना जीवन संग्राम हरक्षण करावाच लागतो ते त्यातून

विरक्त होऊच शकत नाहीत त्या सामान्यांचा. कारण असामान्यत्व हे सुद्धा सामान्यातूनच बहुतांशी निर्माण होते.

दुःख आणि सुख या सापेक्ष संकल्पना आहेत. मनाने ठरविलेल्या, बनविलेल्या, मनास हव्या असणाऱ्या, न हव्या असणाऱ्या, आकांक्षा या सुख व दुःख निर्मितीच्या मुळाशी असणारे एक प्रमुख कारण आहेत हे पण नक्की आणि व्यवहारी आयुष्यात नाना प्रसंगी, हरक्षणी नाना व्यक्तिमत्वांशी येणारा संपर्क हे दुसरे कारण आहे कारण नाना संकल्पनांची जी नाना रुपे एकमेकांशी टकरतात त्यातच या सुख दुःख निर्मितीची प्रक्रिया / बीजें असतात.

सुख आणि दुःख यांच्या व्याख्यासुद्धा व्यक्तिच्या संकल्पनेशी निगडीत असल्याने त्या ठरविणे कठीण आहे. कोणाचे सुख कशात, कसे किती आहे. ते सांगणे पण शक्य नाही, कारण कोणाचे मन ओळखणे व त्या मनोव्यापाराची कल्पना मांडणे बुद्धीप्रामाण्यवादी लोकांनाही जमणार नाही. ते अनाकलनीय गूढ प्रमेय आहे. प्रत्येक माणसाची जीवनवाट वेगळी असते. काही समरुप असतात तर काही सरुप असतात. पण अधिकांश त्या वेगळ्याच असतात. सजीव प्राण्यांनाही सुख दुःखे असतात. पण ती फार थोड्यांना समजतात. प्रत्येक सजीवास भवना असते आणि भावना आली म्हणजेच षड्रिपू आविष्करण आले, पर्यायाने सुख वा दुःख आलेच.

मनोरथ पूर्ती म्हणजे सुख व मनोरथ भग्नता म्हणजे दुःख अशी सुख दुःखाची स्थूलमानाने व्याख्या करता येईल. एकाचे सुख हे दुसऱ्याचे दुःख असू शकते. आयुष्यात प्रत्येक स्वप्नाची संपूर्ण पूर्ती होते असे नाही आणि काही वेळा अर्धवट सुख व अर्धवट दुःख यांचे मिश्रणाचा भोग घ्यावा लागतो. ही जीवनाची आंबट गोड म्हणा कटूमधू सत्यता सर्वांनाच घ्यावयास नियती भाग पाडते. अगदी संपूर्ण सुख ही काटेरी शल्य युक्त तर संपूर्ण दुःखही अणुमात्र सुखावर सोसले जाते. अगदी स्वतःपुरता विचार केला तरी हे सहज लखात येईल की सकाळपासून संध्यासमय / रात्रीपर्यंत आपण कितीतरी वेळा सुखदुःखाचे आवर्तनातून जातो. दिवसभरात आपण कधी उदास, कधी आनंदी, कधी उद्विग्न, कधी समाधानी, कधी चिंतेत तर कधी मस्तीत असतो. त्या वेळा पण आपण सकाळपासून ठरवू शकतो कां? नाही. उलट या सर्व आवर्तनातून जाऊन जीवन जगत असतोच. स्वप्नसृष्टीतही ही आवर्तने आपला पाठपुरावा करतातच. तर अगदी दिवसाही 'दिवास्वप्नांत' ही आवर्तने / स्पंदने आपण अनुभवतो.

''आनंदाचे डोही आनंद तरंग' असे असले तरी जीवनात हा निखळ आनंदाचा डोह काही सर्वांना मिळतो असे नाही. व्यावहारिक जीवनांत असा डोह सापडणे म्हणजे वालुकाप्रदेशी 'मृगजळ'. सर्वबाजूंनी अनेक तऱ्हेच्या समस्याची काटेरी जंगले असतांना असा आनंदनिधीचा ठेवा सापडणे दुष्कर.उलट जीवनाच्या डोहावरती सुख दुःखाचे तरंग सतत उमटत असतात. आहे त्या परिस्थितीवर मात करणे न जमल्याने काही जण 'ठेवले अनंते

तसेची रहावे, चित्ती असो द्यावे समाधान'. अश्या विफल समाधानी वृत्तीची झालेलीही दिसतात. कालपरत्वे माणसाच्या जीवन रहाणीत जो फरक पडला त्याप्रमाणे त्याच्या सुख दुःखाच्या संकल्पनाही बदलतात. कालची सुखे आज दुःखे वाटू लागली तर दुःखे सुखे वाटू लागली. नवी सुखे निर्माण झाली, नवी दुःखे उदया आली. नव्या समस्या, नवी क्षितीजे यातून जीवनाची वाट कल्पनातीत बदलली. विज्ञानाधिष्ठित समाज जीवनात नवी सुख दुःखे निर्माण झाली. मानवी जीवन ढवळून निघाले तरी मानवाचे मन षडरिपूंच्या तावडीतून विज्ञान मोकळे करुं शकले नाही. कोणता क्षण सुखाचा / दुःखाचा ते विज्ञान सांगू शकत नाही. कारण विज्ञान भावनाशून्य असते. मनोविज्ञान हे शास्त्रसुद्धा मनाचे संपूर्ण ज्ञान देवूच शकत नाही. मनाचे नियंत्रण आजही अशक्य आहे आणि म्हणूनच सुख दुःख यांच्या हिंदोल्यावर जीवन झुलते आहे. ''अचपळ मन माझे''... हे आजही खरे आणि म्हणूनच सुख दुःखाच्या जीवनात सुख व दुःखाची अनिश्चितता सुखामागे दुःख येते की दुःखामागे सुख येते ते कळत नाही कोणी सांगू शकत नाही.

माणसाला बुद्धी दिलेली आहे नियतीने म्हणनूच इतर सजीवांपेक्षा त्याची जरी प्रगति झाली तरी सुख व दुःख राहिलीच. दुःख नष्ट नाही करता आले. आमुलाग्र सुखही निर्माण नाही करता आले. आधिदैविक, आधिभौतिक व अध्यात्मिक सुख दुःखे तशीच राहिली स्वरुपांतर झाले काही वेळा एवढेच. या बुद्धीमुळेच मानवाला चिंतन करण शक्य झाले व मन चिंतनाने तो विचार करून कृती करू लागला. अविचारी कृतीसुद्धा अनिष्ट विचार चिंतनाचेच फळ आहे व तो अविचार करणारा जरी त्याला जबाबदार असला तरी त्याच्या अविचारी आविष्काराला वा त्या व्यक्तिमत्वाला त्याचे जन्मदाते व समाजही (समाजव्यवस्था) तेवढाच जबाबदार आहे. कारण समाजात ज्या दुःखदायक घटना घडतात व समाजावर आघात होतात, समजा ढवळून निघतो त्यालाही अशाच व्यक्ति जबाबदार असतात. आधी व्यक्तिला दुःख समाज देतो व पुढे ती व्यक्ति समाजाला दुःख देऊन प्रतिशोध / उट्टे काढण्याचा प्रयत्न करते यात काही नवल नाही हे आपण समजू शकते.

दुःख व सुख यांचा विचार आपण जसा वैयक्तिक करु तसाच तो सामाजिक व राष्ट्रीय दृष्टीकोनातूनही करावयास हवा. कारण समाजपुरुष वा राष्ट्रपुरुष ही व्यक्ति नाही तर तो एक व्यक्तित्वांचे सामुहिक संकल्पीत रुप आहे आणि म्हणूनच वैयक्तिक सुख वा दुःखाच्या विचारात सामाजिक, राष्ट्रीय बांधिलकीचाही विचार असावा असे मलाही वाटते व त्यातूनच लेखाचा विस्तार मी पुढे करू इच्छितो. कोणाला 'जग हे बंदिशाळा' वाटत असते तर कोणाला 'हे विश्वचि माझे घर' असे ही वाटते कदाचित त्या त्या वेळची दोघांची परिस्थिती वेगळी असू शकते म्हणूनच आधि मी लिहिले आहे की एकाचे दुःख दुसऱ्याचे सुख असू शकते. एकाची बंदिशाळा दुसऱ्याचे घर होते हाच तो सापेक्ष फरक.

आणि सुखाचे चिंतन म्हणजे तरी काय? सुखाची स्वप्ने रंगविणे, सुखाचे गत क्षण स्मरणे का सुख कसे असाचे, कसे मिळवावे याचा विचार करणे, का सुखाची चिंता करणे. निश्चित नाही सांगता येत तरी पण दुःखाच्या वळणावर मानवाचे मन निश्चितपणे, सुखाविषयी विचारमग्न होते नव्हे त्याला विचार करावाच लागतो कारण पुढे काय वाढून ठेवले आहे याविषयी अज्ञान असल्याने तो भ्रांत/संभ्रम अवस्थेत असतो आणि येथेच त्याला सुख चिंतन करण्याने एक प्रकारचा दिलासा, धैर्य, विश्वास निर्माण होते व मन तजेलदार बनते. निदानपक्षी दुःखाचे चटके सुसह्य होण्याइतपत तरी मन खंबीर बनते व दुःख सुसह्य होते. दुःखाचे प्रत्येक वळण मानवाला अंतर्मुख करते. तो विचार करू लागतो तो येणेप्रमाणे –

१) दुःख कां, कोणी, कसे, कधी, किती, कश्यासाठी दिले?

२) दुःखाने जीवनात काय गमावले? किती गमावले? स्थायी नुकसान झाले की अस्थायी नुकसान झाले?

३) दुःखाने आताची अवस्था कशी आहे? मनाची, संसाराची, शारीरिक इ.

४) दुःखाने परावलंबित्व बहाल गेले? स्वाभिमान दुखावला? का अन्य कष्टसाध्य मिळकत नष्ट झाली? ठेवा/ निधी गेला का?

५) दुःख निसर्गनियमाने आले की नैसर्गिक आपत्तीने का मानवी व्यवहारातील स्वचुका, इतरांचे फसवणूकीने का सामाजिक, जातीय, प्रांतिय, भाषिक वादामुळे?

६) दुःख असूयेपोटी वा अन्य काही षड्‌रिपूंच्यामुळे इतरेजणांनी पदरी टाकिले?

७) दुःख काय स्वरुपाचे आहे? मोठे, छोटे वा क्षणिक?

८) दुःख स्थायी वा अस्थायी आहे प्रासंगिक आहे का कसे?

याशिवाय आणखीही अन्य अनेक प्रकारचे विचार मनांत येऊ लागतात. त्याबद्दल कल्पना कितीही केल्या तरी त्या अपुऱ्याच ठरतील. व्यक्ति तितक्या प्रकृती, प्रकृती तितकी सुख दुःखांची तऱ्हा त्यामुळे स्थूलमानाने दुःख कसे येते कां येते याच्याबद्दलच्या कल्पना वर मी दिल्या आहेत असेच तरंग मनात प्रत्येक दुःखाचे वळणावर येतात.

दुःखाची वळणे तरी किती प्रकारची असतात कोणासही मोजता मापता येणार नाहीत. प्रत्येक वळणावर मनाचे चिंतन सुखमार्ग/सुख शोधण्याची पराकाष्ठा करते. ''मन चिंती ते वैरी न चिंती'' अशी म्हण सार्थ या करीताच आहे की मनात येणारे विचारतरंग/विकल्प/शंकाकुशंका इतक्या वैविध्यपूर्ण असतात की त्याची वर्गवारी तर सोडाच संख्याही सांगता येत नाही. जशा सागराच्या भरतीच्या लाटांची संख्या मोजता येत नाहीत, किती येतील सांगता येत नाहीत तसेच हे मनाचे विचारतरंग अनाकलनीय, अपरिमित, असंख्य, अमर्यादित, अनेकरुपीय त्यामुळे ते चिंतन पण असेच कालातीत

वाऱ्याच्या गतीचा, लहरीचा असा प्रकार ठरविणे कठीणतम तद्वत हे चिंतन. कधी प्रचंड भोवरा तर कधी निश्चित दिशेने तर कधी सैरभैर मनाच्या क्षमतेची चिंतनाशी सांगड घालता येणे शक्य आहे आणि येथेच फरक यामुळे सहजी जाणवतो तो विवेकी पुरुषाचे चिंतन, योग्यांचे चिंतन, अविवेकी पुरुषांचे चिंतन, संतांचे चिंतन व सामान्य जनांचे चिंतन यांच्यात दुःखाचे वळण एक असले तरी त्यावर संतमन चिंतन व व्यावहारिक मनचिंतन एकदम वेगळे असते. कल्पना तीच पण त्यावर जशी काव्यरचना वेगळी असते अगदी तसेच या चिंतनाचे/सुख चिंतनाचे आहे.

काही जण दुःखाने वेडेपिसे होतात तर काही दुःख गिळून असे सामोरे येतात. वाटावे ही काय माणसे आहेत? सुखाची सावली यांनी कधी पाहिलीच नाही. असे वाटावे जितकी ती दुःखाच्या टोकाला गेलेली असतात व त्यातून बाहेर पडण्यास त्यांना मार्ग सापडत नसतो वा कोणी जरी सांगितला तरी तो मार्ग पकडून सुख सावली शोधण्यास ती असमर्थ/ हतबल असतात.

मानवी मनाची महती अशी आहे की सुख कितीही मिळाले तरी त्याला ते अपुरेच वाटू लागते. अधिक सुखाचा हव्यास त्याला सुखातही दुःखी करतो. काटेरी वा बोचरे सुख म्हणतात ते हेच. तेव्हा समाधानी आनंदी वृत्तीने सुखाचा उपभेग घेण्याची वृत्ती फार विरळा विवेकाचा आनंद फार मोठा असतो आणि हा सर्वांना मिळत नाही कारण विवेकी मन दुःख व सुख यातला फरक आणते व अशाश्वत जीवनांत शाश्वत सुख सावली मिळविण्याचा प्रयत्न करणे कर्तव्य मानते आणि म्हणूनच सगळे विवेकानंद होत नाहीत. गारेसारखे पाण्यात राहणे जमते ते या योगी संत पुरुषांनाच.

भगवान गौतम बुद्धाचे पूर्वोयुषी त्याच्याजवळ काय राजवैभवाची प्रकांड सुखछाया दर्शन देऊन गेले त्यामुळेच त्याच्या मनात शाश्वत सुखाची सावली शोधण्याचा विवेक जागृत झाला व जे राजवैभव आहे ते येणारी शाश्वत दुःखे जन्ममृत्यू जरा टाकू शकत नाहीत याची प्रखर जाणीव झाली. परिणाम सुख सावलीचा त्याग करून बोधीवृक्षाचे सावलीत अध्यामज्ञानाक्षरे शाश्वत सुखसावलीसाठी आयुष्यातील समिधा करून ती श्रेष्ठावस्था प्राप्त करून त्याचा उपदेश जगाचे दुःख कमी करून सुखसावली मिळण्यासाठी केला. ते चिंतन किती जण करू शकतात? आणि म्हणूनच सुखसावलीचे असे हे तत्वज्ञान देणारे महामानव फार थोडे असतात. ते विश्वाचा संसार करतात. विश्व त्यांचे घर असते व त्यांच्या तत्वज्ञानाची सावली सामान्यांना सुखाची सावली ठरते. अनेक दुःख प्रसंगी अश्या संतांचे ग्रंथ आदि सुखाची सावली देतात. मन त्यांचे चिंतन करते व ती सावली त्याला सुख देते असाही अनुभव येतो.

आता या सुखाच्या सावलीचे चिंतन म्हणजे काय याचा विचार करू या. सुखाची सावली ही एक सापेक्ष मन संकल्पना आहे. प्रत्येक जणच या सावलीचे चिंतन करून

जगतो. वर जी ८/१० कारणे दुःखाचा विचार करणारी लिहिली आहेत. ढोबळमानाने त्यावरून लक्षात येईल की सुख सावलीचे चिंतन त्या अनुरोधानेच होते.

दुःखाचा आघात मनाला जखमी करतो. जे दुःख भरूनच येत नाही ते म्हणजे मरण. अशावेळी मन त्या व्यक्तिच्या आठवणीत काही दिवस त्रस्त होते. ही जखम लगेच भरत नाही. ही हानी भरून येणारी नाही हे लक्षात आल्यावर मन हळूहळू घट्ट होते. ''मरे एक त्याचा दुजा शोक वाहे, अकस्मात तोही पुढे जात आहे''. काळ हेच यावरचे औषध आहे. माणूस यातूनच वर येतो. तो आत्मबलावरच. यावेळी माणूस सावरतो तो या जिद्दीने की हे तर क्रमप्राप्तच आहे हे अटळ आहे. जो येतो त्याला जावेच लागते. देव, संत, सर्व आले व गेले आणि मग मनात जागृत होणे कर्तव्याची व पडलेल्या जबाबदारीची जाणिव. मन मग आसरा घेते अशा विचारांचा आणि सुख सावली आता आपणास द्यावयाची आहे या विचाराने तो सुख निर्माण करूं लागतो सुखाची सावली तो स्वतःच निर्माण करतो. ज्यांचे आईवडील लहानपणीच जातात त्यांना सुखाची सावली किती मिळते आणि ज्यांचेवर माया करणारे लोक/आप्तेष्ट असतात ते तरी किती निरपेक्षतेने सुखसावली त्यांचे वर धरतात? लोभापायी, स्वार्थापायी मिळणारी ही सुख सावली खरी सुखाची असूच शकत नाही. तेव्हा यावेळी सुख सावली शोधतांना मनाला अतिशय सावधगिरीने, साधकबाधक विचार करून ती सावली शोधावी लागते. नाहीतर आसऱ्यास जावे अन तेच झाड अंगावर पडावे अशी अवस्था आगीतून निघून फुफाट्यात पडण्याची वेळ येते. ही सुख सावली आपणास शोधावी लागणारच असते. तेव्हा त्या अपरिमित हानीसाठी मन तयार करावे. अध्यात्म संस्करणाने पण अंधश्रद्धेने नव्हे तर व्यावहारिक जगताचे स्वरुप जाणून हेच या हानीवरील सुखसावलीचे चिंतन होय.

दुःख भोगणे एवढेच मानवाच्या हाती/नशिबी असले तरी सुखाच्या सावलीची स्वप्ने त्याने पाहू नयेत असे नाही. आशा माणसाच्या आयुष्यात नसती तर? आशेवरच मनुष्य जगतो आणि आकांक्षा करतो यात काही वावगे नाही. ''दैवज्ञात दुःखे भरता दोष ना कुणाचा, पराधिन आहे जगती पुत्र मानवाचा या सत्यातही घन तमी शुक्र बघ राज्य करी'' हे पण मनाला धीर देण्यासाठीच आहे. सुखाची सावली कोणाला नको असते? आणि सावलीचे सुख दुःखाच्या वणव्यातच कळते. अर्थात सुख सावलीचे चिंतन सुद्धा वास्तवाशी निगडीत असावे नाहीतर त्या चिंतनातूनच दुःखाचे उमाळे पडतात पदरात. शेख महंमदी स्वप्ने पाहणे ही एक मानसिक अपंगावस्था आहे. सुखाचे चिंतन, सुखसावलीचे चिंतन प्रत्येक दुःखानुरुप वेगळे असणारच. ही सुख सावली वास्तवदर्शी असणे अत्यंत जरुरीचे आहे अन्यथा वैफल्याचे दुःख वाट्यास येणार हे नक्की. तेव्हा सुखाचे चिंतन/सुखसावलीचे चिंतन करतांना मन भरकटूं देणे सर्वथैव अयोग्य. मनाची प्रगल्भ अवस्था सुयोग्य

सुखसावलीचे स्वरुप उभे करील तेव्हा या सुख सावलीचे चिंतनात काही गोष्टी कटाक्षाने पाळाव्यात त्या प्रथम पाहू?

अ) जे सुख सावलीचे स्वरुप अभिप्रेत आहे ते सुख मिळविण्यासाठी स्वतःची क्षमता (बौद्धिक-शारिरीक-आर्थिक) किती आहे? आत्मविश्वास किती आहे व परावलंबित्व असेल ते 'पर' किती विश्वासार्ह आहेत? त्यांचा आधार काय क्षमतेचा आहे?

ब) सुख सावली मिळवण्याच्या प्रयत्नांत कर्तव्य विसरत तर नाही ना? नाहीतर ज्या सुख सावलीचे प्राप्तीसाठी धडपडायचे त्यात गुरफटून इतर अत्यावश्यक कर्तव्यच्यूततेने अत्यावश्यक कर्तव्य करण्यात कसूर केल्याने इतर दुःखे दत्त म्हणून सामोरी यावयाची.

क) दुःख काय आहे? आणि तयासाठी ही सुख सावली मिळविण्याचे साठी खरेच मनास चिंतनांत गुरफटवणे योग्य आहे काय?

ड) नैसर्गिक वा राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थितीने प्राप्त दुःखातून ज्या सुख सावलीची अपेक्षा करतो ते दिवास्वप्न तर नाही ना?

इ) अटळ दुःखांत सुख कशात आहे ते शोधण्यासाठी धार्मिक ग्रंथ इ. चा काही व्यावहारिक उपयोग पहावा.

फ) सुखाची सावली मिळवतांना मृगजळाचे मागी तर लागत नाहीना? अशाच दुःखातून इतर कसे बाहेर पडले त्याचा विचार करावा.

ग) शारीरिक दुःख कायमच्या अपंगत्वाचे असेल तर जीवनाचा पर्यायी मार्ग स्विकारून सुख सावली मिळवितांना मनास किती आवरावे/सावरावे लागेल.

ह) सुख सावली मिळवतांना धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांचा सम्यक विचार करावा लागेल. काही दोर कापावे लागतील तर काही गुंफावे लागतील. काही त्याग करावा लागेल याचीही सुयोग्य जाण ठेवावी लागेल.

ज) सुख सावली स्थिर असेल का तयातही काटेरी जाणिवांनी दुःख मिळेल? महत्वाकांक्षेला अनुरुप विसावा दिलासा तेथे मिळेल काय?

ल) आयुष्याचे सिंहावलोकन करून गत आयुष्यात अशा किती सुख सावल्या आपण मिळवूं शकलो व त्याचे फलीत काय याचा सम्यक विचार करावा.

सुखाच्या सावलीचे चिंतन करतांना दुःख स्वतःचे असेल तर ते चिंतन आत्मकेन्द्री असू शकते परंतु जर स्वआप्त वगैरेना त्या दुःखाने घेरले असेल तर ते चिंतन मग थोडे जास्त रुंद कक्षेचे असावे लागते.

आता संतमहात्मे योगी पुरुष आपणास जो उपदेश करतात वा ईश्वराची करुणा भाकतात त्याद्वारे ते आपल्यासारख्या सामान्य माणसाला सुखसावलीचे छत्र देत असतात. स्वतःसाठी त्यांना या व्यवहारी जगाकडून काहीच नको असते. त्यांचे जीवनच दया, प्रेम, शांती, अहिंसा व परोपकांनी भरलेले असते. परोपकारातही सुख सावली मिळते. मनःशांती मिळते. शेवटी सुख सावली आपण दुःखाच्या वळणावर कां शोधतो तर मनाची

शांती मिळावी, जखम भरुन याची म्हणूनच ना? हे निर्लेप योगी संसारी लोकांच्या विश्वाचे कल्याणाचीच काळजी वहातात. त्यांना आपपरभाव नसतो. ''आनंदे भरीन तिन्ही लोक'' अशी भावना ते बाळगतात. संसारी सुख व दुःख त्यांना विचलीत करुं शकत नाही पण समाजाप्रती त्यांचे जे कर्तव्य असते ते त्यांना करावयाचे असते. खऱ्या साधुसंतांची जीवनरहाणी ही समाजाला विचारधनाद्वारे दुःख सहन करण्याची ताकद देते. समाजाचे ऋण ते जाणतात आणि त्याची परतफेड ह्या विचारधनवृक्षाची छत्रछाया करून करतात. विश्वकल्याणाचे कंकणच त्यांनी बांधले असते. हे चंदन वृक्ष असतात. शांत शितल सुख सावलीचे समाजाने त्यांना अपरिमित दुःख दिले आहे तर पण त्यांनी त्या दुःखामुळे प्रतिशोध घेतला नाही तर समाजाला वर आणण्यासाठी, उन्नतीसाठी त्यांनी सर्वस्व निरपेक्षतेने वेचून सुख सावली दिली. त्यांच्या चरित्रांचा अभ्यास जरी असला तरी दुःखाचे वळणावर त्या चरित्रांचे अध्ययन सुखाची सावली देण्यास समर्थ असते.

विश्व कल्याणाची सुख सावली ते महात्मे संत ईश्वराजवळ मागत असतात. श्री ज्ञानेश्वरांचे 'पसायदान' ही वैश्विक प्रार्थना याचे प्रतिक आहे.

दुःखाच्या प्रत्येक वळणावर सुखाच्या सावलीचे चिंतन नुसतेच करीत बसू नये तर कृती पण करावी तरच ती सावली गवसेल नाहीतर त्या सुखसावलीचे एक भ्रामक प्रतिमारुप क्षणिक सुख तर लगेच दुःख देईल.

सुखाची सावली ही काही वृक्षाची सावली नाही जी दिसेल. ती आहे विचार सूर्यप्रकाशे जीवनवृक्षाची सावली जीवन वृक्षावर पडलेली त्याला सतेज करणारी, जीवन देणारी मनाला त्या सुखसावलीत नेण्यासाठी चिंतन करावयास हवे पण ते वस्तुनिष्ठ हवे एवढेच या लेखांती मला सांगावयाचे आहे. ज्या वळणांना टाळू शकत नाही तेथे ते वळण पार पाडण्यासाठी धैर्य, क्षमता, देणारे चिंतन उपयोगी पडते हे निश्चित.

दुःखाची वळणे अनाकलनीय, अकल्पित, असाधारण असतीलही तरी मनाला सुखाची ओढ असतेच व ती सुखसावली शोधण्यासाठी चिंतन करतांना वरील प्रमाणे विचार केला तरी सुख सावलीची प्राप्ती करून घेता येईल व जनाएवढ्या सुखसावलीचे छत्र पर्वताएवढ्या दुःखाच्या तापातून संरक्षण देईल हा विश्वास.

दुःखाची वळणे म्हणजेच ''रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग, अंतर्बाह्य मन आणि जग'' यातून निर्माण होणारी शल्ये व त्यामधून मन सावरुन सुखाच्या सावलीत विसावण्यासाठी चिंतन करून सायक सावली मिळविणे हाच खरा विवेकी मानवाचा मानव्य धर्म, हेच खरे जीवन मर्म हीच खरी जीवन निष्ठा, प्रणाली व समाधान इत्यलम.

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

# भारतीय जीवन-चिंतन आणि तंत्रज्ञान

सुरेश भागवत

शालेय जीवनाच्या कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर आपल्याला 'विज्ञान-तंत्रज्ञान : शाप की वरदान' ह्या विषयावर बोलण्याचा किंवा लिहिण्याचा प्रसंग येतो. विज्ञान-तंत्रज्ञान जीवनास उपकारक आणि विघातक अशा दोन्ही रूपांत योजलेले आढळते. त्यामुळे अशी चर्चा होणे स्वाभाविक आहे. प्रत्यक्ष जीवनात मात्र गंभीरपणे अशी चर्चा झालेली फारशी आढळत नाही.

विज्ञान-तंत्रज्ञान विघातक सिद्ध होते तेव्हा त्यास काही हितसंबंध कारण असतात. त्या खेरीज दोन दार्शनिक कारणेही असतात. व्यक्तिगत जीवनाचे व संघटित समाज जीवनाचे उद्दिष्ट काय असावे; तसेच, ह्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचे महत्त्व काय आणि मर्यादा कोणत्या हे स्पष्ट नसल्याने घात होतो.

भारतीय चिंतन 'सुखांची प्राप्ती' हे जीवनाचे उद्दिष्ट मूलतः मानतच नाही. पण, ही तात्त्विक भूमिका बाजूला ठेवून सुखांची प्राप्ती हेच उद्दिष्ट मानले, तरी व्यापक समाजहिताच्या चौकटीत, आणि एकूण सृष्टीच्या सुस्थितीच्या मर्यादेमध्ये मनुष्यसमाजाने सुख-समृद्धी साधावी असा मर्यादशील जीवनविचार जेव्हा दुर्लक्षित होतो, तेव्हा विज्ञान-तंत्रज्ञान विघातक सिद्ध होते.

विज्ञान-तंत्रज्ञान ही मानवी संस्कृतीची एकमेव उपलब्धी नसून, तुलनेने दुर्लक्षिलेले अन्य ज्ञान-विज्ञान हे तंत्रज्ञानाच्या बरोबरीस आणले पाहिजे. ज्ञानाच्या विविध प्रकारांचे संतुलन साधून त्यांच्या कार्यकक्षा स्पष्ट झाल्यावर त्यांमध्ये विरोधाऐवजी सामंजस्य प्रस्थापित होईल, विज्ञान-तंत्रज्ञान मर्यादशील होईल.

मनुष्याने प्राप्त केलेले ज्ञान हे चार प्रकारांमध्ये विभागणे शक्य आहे :

१. विज्ञानाच्या विविध शाखा (pure science), विविध भौतिक तत्त्वे आणि पदार्थांच्या स्वभावधर्मांचे, गुणधर्मांचे ज्ञान ह्यात मोडते. हे ज्ञान तौलनिक अंगांसह असते.

२. मनुष्याच्या जीवनातच्या आवश्यकतांची पूर्तता करणारे ज्ञान. ह्यामध्ये विज्ञान थेट किंवा तंत्ररूपाने योजलेले असते. (Application of science)

३. विश्वात भौतिक दृष्टीने जी विविधता अनुभवास येते त्या अंतर्गत काही 'एकत्व'सुद्धा आहे अशी जाणीव होणे हा ज्ञानाचा तिसरा प्रकार आहे. देश-संस्कृती-उपासना पंथ-भाषा इ. कारणांनी विभागलेला मानव एक आहे असे मानणे हे एकत्वाच्या विचाराचे समाजशास्त्रीय रुप आहे. विज्ञानानेही एकत्वाच्या विचाराचा मर्यादित स्वीकार केला आहे. तृणपात्यापासून वटवृक्षापर्यंतच्या विविध प्रजातींमध्ये एकत्व मानल्यावरच 'वनस्पतिशास्त्र'; व कृमि-कीटकांपासून

गेंड्यापर्यंतच्या विविध प्रजातींमध्ये एकत्व कल्पिले तरच 'प्राणिशास्त्र' रचले जाते. एकत्वाची कलप्ना केली नाही, तर विविध प्रजातींना समावेशक अशी वनस्पती, प्राणी, सजीव ही सामान्यनामेही निर्माण होऊ शकणार नाहीत. एकत्वाचे हे विज्ञानीय रूप आहे.

भारतीय विचारवंतांनी प्राचीन काळापासून ह्याहून व्यापक 'एकत्वा'चा सिद्धान्त मांडला आहे. चराचर सृष्टीतील सर्व तत्त्वांना आणि पदार्थांना व्यापणारे व त्यापैकी प्रत्येकामध्ये निवास करणारे एकमात्र तत्त्व असून ते नित्य म्हणजे अविनाशी, चैतन्यमात्र, अमर्याद देशकाल व्यापणारे, अर्थात् सच्चिदानंदरूप आहे असा हा सिद्धांत आहे. अनेक साक्षात्कारी महात्म्यांनी प्राचीन काळापासून वर्तमानापर्यंत त्याची यथार्थता मानवजातीच्या ध्यानीं आणून दिली आहे. ह्या सिद्धान्तामुळे मनुष्याचा निसर्गातील सर्व तत्त्वांशी आणि सजीव-निर्जीवांशी आत्मीयतेचा संबंध जुळतो. पर्यावरणिक जागृतीसाठी हा खूप थोर व महत्त्वपूर्ण तात्त्विक आधार आहे.

४. मनुष्याने प्राप्त केलेले चौथे ज्ञान त्याच्या स्वतःच्या अंतरावकाशाविषयी आहे. अंतरात वसणारे 'एकत्व' - सच्चिदानंदरूप तत्त्व - हाच खरा 'मी' असून, तशी अनुभूती साधनेद्वारे प्राप्त करणे हे जीवनाचे उद्दिष्ट आहे. देह-मन-बुद्धीद्वारे होणाऱ्या जगाविषयींच्या अनुभूतींचा अवलंब देहधर्म भागविण्यापुरेसा करावा. त्या अनुभूती 'सुख' नसून अंतरावकाशाची तरंगविहीन जलाशयाप्रमाणे पूर्ण शांत अवस्था हेच खरे सुख होय. त्या अनुभूतींना सुख मानून त्यामध्ये गुंतल्यास निरंतर वृद्धिंगत होणारी तृष्णा निर्माण होऊन अंतरावकाश नित्य अशांत राहते. मनातील इच्छांचे शमन, इंद्रियांचे दमन, खरे सुख होणते हा (नित्यानित्य-) विवेक ह्यांच्या बळावर तृष्णेपासून मुक्ती मिळविणे ही सच्चिदानंदाची अनुभूती मिळविण्याची पहिली पायरी होय. मनुष्याच्या अंतरावकाशाविषयीच्या ज्ञानाचा हा आशय आहे.

ज्ञानाचे चारही प्रकार हे सर्वसाधारण जीवनासाठी अनिवार्यतया आवश्यक आहेत. त्यामुळे ते परस्परतुल्य व समान महत्त्वाचे आहेत. ते समृद्धी, संतोष, शांती मिळवून देतात. मनुष्य सध्या सुखाकांक्षा व त्यांच्या पूर्तीसाठी विज्ञान-तंत्रज्ञान एवढीच जाणीव बाळगत असल्याने मन, बुद्धी आणि प्रत्यक्ष व्यवहार एकांगी बनला आहेत. ज्ञानाच्या वरील चारही प्रकारांची नित्य जागती जाणीव बाळगली, तर मनुष्याचे मन, बुद्धी व व्यवहार संतुलित होईल.

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे समाजाच्या सुख-समृद्धीच्या चौकटीत व्यक्तिगत सुखसमृद्धी आणि एकूण सृष्टीच्या सुस्थितीच्या चौकटीत मनुष्यजातीची सुखसमृद्धी हे जीवनाचे उद्दिष्ट बाळगून; एका बाजूला अंतरावकाशातील शांती प्राप्त करणे व दुसऱ्या बाजूला बाह्यावकाशातील समाज व निसर्गाशी असलेले एकत्वाचे, दायित्वाच नाते सांभाळणे हे धोरण अंगीकारून; हे उद्दिष्ट आणि धोरण

ह्यांच्या मर्यादेत विज्ञान-तंत्रज्ञानाचे उपयोजन करणे, हा योग्य जीवन-विचार होय. विज्ञान-तंत्रज्ञानाची योजना करण्यापूर्वी व केल्यानंतर त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणिक इ. परिणाम तपासणे आवश्यक आहे. ह्या जीवनविचाराद्वारे चारही प्रकारच्या जाणिवांचे संतुलन साधल्यावर दोन व्यक्तींमधील संबंध, दोन समाजांमधील संबंध, समाज व व्यक्तीमधील संबंध, तसेच मनुष्यजात व निसर्ग ह्यांमधील संबंध शोषणमुक्त तर होतीलच; परंतु ते परस्पर-कल्याणकारकही होतील. हा आदर्शवाद असाध्य नाही.

जीवनविचार आणि विज्ञान-तंत्रज्ञानाची निवड ह्यांमधील संबंध स्पष्ट होण्याकरता म. गांधींचे विचार मार्गदर्शक ठरतात. महात्माजींच्या स्वप्नातील भारत हा प्रमुखतः गावांचा बनलेला होता आणि भारतीय समाज आध्यात्मिक मूल्यांना अंगीकारून, शक्य तेवढ्या कमी सामग्रीनिशी, संतोषाने, साधेपणाने जगणारा होता. स्थानिक उत्पादन व स्थानिक सेवा ह्यांवर सर्वांनी शक्य तेवढा निर्वाह करावा अशी त्यांची अपेक्षा होती. त्याद्वारे ग्रामीण रोजगार निर्माण व्हावा व त्याचबरोबर परस्पर सहकार्य सहजीवनाचा भाव निर्माण व्हावा असे त्यांना वाटे. त्यामुळे गांधीजींनी अशा जीवनासाठी उपयुक्त अशा तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला.

'संपूर्ण सृष्टी एकजीव आहे' असे भारतीय तत्त्वज्ञान आहे. भारतीय व्यक्ती वृक्ष-वल्ली-वनचरांकडे समत्वाने पाहतात. शक्य तेवढी निसर्गानुकूल जीवनशैली त्या अंगीकारत आल्या आहेत. वन्य व ग्रामीण समाज हे नागरी समाजांपेक्षा निसर्गाशी अधिक एकरूपतेने जगत आले आहेत. त्यामुळे त्यांनी विकसित केलेली तंत्रे निसर्गाशी पूर्णतया एकरूप होती आहेत. जीवनाच्या प्रायः सर्व क्षेत्रांमधील अशा तंत्रांची उदाहरणे इतिहासात नव्हे, अगदी वर्तमानातही भरपूर पाहावयास मिळतात. तंत्रज्ञान म्हणजे ऊर्जा, संगणक, यंत्रमानव अशा आजच्या वातावरणात कोणतीही मोठी यंत्रसामग्री, ऊर्जा न वापरता निर्माण केलेले व चालवलेले हे तंत्रज्ञान अविश्वसनीय भासते. ह्या तंत्रांच्या अनेक मर्यादा आहेत. आजच्या आवश्यकतांना व समस्यांना ती तोकडीही असतील. तथापि, त्यांचया उल्लेखाचा हेतू असा की, पर्यावरणावरील ठसा व आघात शून्यवत् असणारे, निसर्गाशी एकरूप असे तंत्रज्ञान म्हणजे काय हे स्पष्ट व्हावे; तसेच, जीवनविचार, जीवनशैली आणि विज्ञान-तंत्रज्ञानाची निवड ह्यांमधील संबंधही ध्यानात यावा.

**सुरेश भागवत**
A-7/603, साकेत कॉम्प्लेक्स,
ठाणे - ४००६०१
भ्रमणध्वनी : ९८६९०२८३२७

•••

स्वसा माताच दुहिता एकशय्यां परित्यजेत्।
बळवान् इंद्रिय-ग्रामो विद्वांसमपि कर्षति ।।

या श्लोकाचा अर्थ आधी सांगतो व मग कथा सांगतो.

अर्थ - (आपली स्वतःची) बहीण माता व मुलगी यांच्याबरोबर एकाच बिछान्यावर (कधीही झोपू नये) झोपणे टाळावे. (कारण) इंद्रियरुपी गाव इतके सामर्थ्यवान आहे की मोठमोठ्या विद्वानांचाही याबाबतीत भ्रमनिरास करते. त्यांना विषयकर्दमी गुंतवून टाळते. आता या संदर्भातील कथा -

व्यास महर्षींच्या आश्रमात जैमिनी नावाचा एक शिष्य होता. त्याचे अध्ययन पूर्ण झाल्यावर व्यासमहर्षींनी त्यास स्वगृही जाण्याची अनुमति दिली. पण जैमिनी आश्रमात इतका रमला होता की त्यास आश्रम सोडून घरी जाण्याची कल्पना रुचेना! 'आणखी काही काळ आश्रमात राहू द्यावे' अशी त्यांनी गुरुजींना विनंती केली व गुरुजींनीही त्याला अनुमति दिली.

नंतर एके दिवशी विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या ओघात -

स्वसा माता च दुहिता एकशय्यां परित्यजेत्। बलवान् इंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ।। हा श्लोक सांगितला व अर्थाचे स्पष्टीकरण केले. ते ऐकल्यावर जैमिनीने व्यासांना विचारले - आचार्य या श्लोकात 'विद्वांसमपि कर्षति' ऐवजी 'विद्वांसं नापकर्षति' असे घेतले तर अधिक योग्य होईल असे मला वाटते. आपले काय मत आहे? व्यासमुनी म्हणाले, 'जैमिनी, तू अजून आश्रमातच आहेस ना? ४/५ दिवस थांब. तुला याचे उत्तर आपोआपच मिळेल!

नंतर एकदा जैमिनीस आश्रमात थांबण्यास सांगून इतर शिष्यांसह व्यासमुनी मध्यान्ह स्नानासाठी नदीवर गेले. सूर्य डोक्यावर आलेला, वैशाख महिन्यातले रणरणते ऊन 'मी' म्हणत होते. व्यासमुनी नदीवर पोहोचतात तोच वातावरणात प्रचण्ड बदल झाला. सोसाट्याचा वारा वाहू लागला. मुसळधार पाऊस सुरु झाला. ढगांचा गडगडाट, विजांचे तांडवनृत्य सुरु झाले. इकडे आश्रमपरिसरातही तोच बदल् अशावेळी पावसात नखशिखान्त भिजलेली, थंडीने कुडकुडणारी एक युवती आश्रयाचे अपेक्षेने आश्रमाचे दाराशी उभी असलेली जैमिनीस दिसली. जैमिनीने आदरपूर्वक तिला आश्रमात यावे अशी विनंती केली. ती युवतीही आश्रमाचे आत आली. यज्ञकुंडाजवळ बसून उष्णतासुख अनुभवू लागली. जैमिनीने ग्रंथ वाचनास प्रारंभ केला.

पण काही केल्या वाचनात चित्त एकाग्र होईना! यज्ञकुंडाजवळ बसलेल्या त्या ओलेत्या युवतीकडेच नजर जाई. शेवटी जैमिनीने तिला स्पष्टपणे विचारलेच, 'हे स्त्रिये, मजबरोबर विवाह करशील?' तेव्हा त्या स्त्रीने उत्तर दिले, 'आनंदाने, पण माझी एक अट आहे. ती मान्य असेल तरच!

अट न ऐकताच जैतिनीने होकार दिला व नंतर विचारले, 'हे सुंदरी, काय अट आहे?'

युवती म्हणाली, 'ऐकावे! विवाहापूर्वी हाताने पायाचे अंगठे पकडून, मला पाठीवर घेऊन, समोरील वटवृक्षाला ७ प्रदक्षिणा घालायच्या. प्रदशिक्षा चालू असताना मी आपणास चाबकाने फटके मारीन! ते मुकाट्याने सहन करायचे आहे मान्य?

'कामातुराणां न भयं न लज्जा' या उक्तीनुसार अट मान्य केली व केवळ मान्यता देऊन थांबला नाही तर गुरुजी येण्यापूर्वी अट पूर्ण करावी असा मनाशी विचार करून तत्परतेने आचरणास सिद्ध झाला. तिला पाठीवर घेऊन प्रदक्षिणा सुरू झाल्या. पाठीवर चाबकाचे फटके सहन करीत एक... दोन...तीन... करता करता ७ वी प्रदक्षिणा सुरु झाली. अतीव आनंदाने ७ वी प्रदक्षिणाही पूर्ण केली. तिला खाली उतरावयास विनवले. ती खाली उतरल्यावर अट पूर्ण केली असल्याने विवाहासाठी पाणिग्रहण करण्याच्या अपेक्षेने वर पाहतो तो काय आश्‍चर्य! तिच्या ऐवजी जैमिनीस व्यासमहर्षींचेच दर्शन झाले! व त्यांच्याकडे दृष्टी जाताच व्यास मुनींनी जैमिनीस विचारले, 'जैमिनी, तू अजूनही तुझ्या 'विद्वांसं नापकर्षति' या विचारांवर ठाम आहेस ना?'

लज्जित झालेल्या जैमिनीने कान पकडून आपली चूक मान्य केली व गुरुजींना साष्टांग दंडवत घालून क्षमा याचना केली!!

**श्रीकांत अनंत बर्वे**

●●●

(पृष्ठ क्र.८ वरून... **गीतकृष्णायन**)

संजयानं स्तंभित होऊन म्हटलं, महाराज, हे काय केलंत आपण!

आपल्या क्रोधाला आपण बळी पडल्याचं लक्षात येऊन धृतराष्ट्र विषण्णपणे म्हणाला, अरेरे! माझे जिवीत पुत्रही आता मी मृत्युमुखी धाडतो आहे ना!

लगेच कृष्ण पुढे होऊन म्हणाला, भीम सुरक्षित आहे धृतराष्ट्रा. काय होऊ शकेल याचा मला अंदाज असल्यानं मी भीमाचा पुतळा मात्र पुढे केला. तुझ्या ज्येष्ठ पुत्राच्या दुराग्रहाला तू वेळीच आळा न घातल्यानंच हे सर्व घडलंय. पण अजूनही वेळ गेलेली नाही. तू पांडवांना आपले पुत्र समजावंस आणि उर्वरीत काळ त्यांचं ईष्ट चिंतण्यात व्यतीत करावास.

पांडवांना जवळ घेऊन मुसमुसत धृतराष्ट्र म्हणाला, होय रे कृष्णा! ही माझीच मुलं आहेत असं मी समजतो.

त्यानंतर कृष्ण हळूच हृदयद्रावक आक्रंदन करत असलेल्या गांधारीजवळ जाऊन भावनेनं भिजलेल्या स्वरात तिला म्हणाला, माते, विधीलिखित अटळ असतं. आपण कृपया शांत व्हावं.

यावर उसळून गांधारी कृष्णाला म्हणाली...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

## ज्ञानोबांच्या उत्तुंग कवि-कल्पनेचा एक मासला

प्र. सि. मराठे

ज्ञानेश्वरी हा भगवद्गीतेवरचा टीका ग्रंथ आहे असे ज्ञानेश्वरांनीच म्हटले आहे. भगवद्गीतेचा प्रत्येक श्लोक (संस्कृत) घेऊन त्यातील भावार्थ, उपमा, रुपक यासारख्या काव्यालंकारांचा उपयोग करून मराठी वाचकांना समजावून सांगण्यासाठी त्यावर त्यांनी अनेक ओव्या रचल्या आहेत. म्हणजे सरासरीने एका श्लोकाचा भावार्थ १२/१३ ओव्या रचून विस्ताराने समजावून सांगितला आहे. एक दोन ठिकाणी केवळ कथनात्मक आशय असलेल्या गीतेच्या श्लोकावर एकच ओवी ज्ञानेश्वरीत आली आहे तर १३ व्या अध्यायाच्या ७ व्या श्लोकावर विवरण करण्यासाठी ज्ञानेश्वरोनी ३२७ ओव्या खर्ची घातल्या आहेत.

गीतेतील श्लोकावरील टीकेत ज्ञानेश्वरांनी त्या श्लोकांतील आशयावर विवरण करताना, त्या आशयाच्या आनुषंगिक विषयांवरही आपल्या प्रत्यक्ष अनुभवावरून टिप्पणी केली आहे. आणि म्हणून 'ज्ञानेश्वरी हा गीतेवरचा केवळ एक टीकाग्रंथच न राहता त्याला एक स्वतंत्र धर्मग्रंथाचे स्थान प्राप्त झाले आहे.' असे लो. टिळकांनी त्यांच्या 'गीतारहस्य' या ग्रंथात म्हटले आहे.

आधीच सुंदर बनावट असलेल्या मंडपाची शोभा एखाद्या कलाकाराने पुष्पांच्या सजावटीने द्विगुणित करावी. तसलाच प्रकार आपल्या ज्ञानेश्वरीत अनेक स्थळी अनुभवास येतो.

गीतेच्या सातव्या अध्यायाच्या २७ व्या श्लोकावरील ज्ञानोबांनी केलेल्या ओव्या वाचताना त्यांच्या उत्तुंग कविकल्पनेचा विलास आपल्या अनुभवास येतो.

सातव्या अध्यायाचा २७ वा श्लोक असा आहे.

**इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत।**
**सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।।२७।।**

मराठीत

**उद्भवे द्वेषइच्छांनी सुखदुःखादि द्वंद्व जे।**
**तयाने सर्व मोहांत भूतग्रामचि ते भ्रमे।।२७।।**

या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा आहे.

हे भारता, इच्छा व द्वेष यांपासून उत्पन्न झालेल्या (सुख दुःखादि) द्वंद्वरूपी मोहाच्या योगाने (या जगात) सर्व प्राणी (मानव) मोह पावतात.

**विवरण –**

आपल्या देहाची पंचेन्द्रिये त्यांच्या विषयांकडे धाव घेत असतात, आणि त्यामुळे मानवाला ते विषय भाग मिळविण्याची इच्छा होते. आणि त्याची कर्मेन्द्रिये ते भोग मिळविण्यासाठी धडपडू लागतात. ती इच्दा पुरी होईपर्यंत माणसाला एक प्रकारची अस्वस्थता येते व त्यामुळे मन काळजीत

राहते. जेव्हा ती इच्छा पुरी होते तेव्हा तात्पुरते समाधान लाभते, परंतु थोड्या काळाने आणखीन भोगांची इच्छा होऊन 'कामेच्छा' आणखीनच वर्धमान होते आणि परिणामी मनाची काळजी व घालमेलही जास्त प्रज्वलित होते. महाभारतात ययातीच्या तोंडी याच अर्थाचा श्लोक आला आहे.

**न जातु कामः कामानां उपभोगेन शाम्यति।**
**हविषा ऊर्ध्ववर्त्मेव भ्य एवाभिवर्धते।।**

अशी ही कामेच्छा कधीच शमत नाही तर एकसारखी वाढतच राहते. आपला इच्छित कामभोग आपल्याला न मिळता दुसऱ्याला मिळाला तर इच्छेबरोबर दुसऱ्याबद्दल द्वेष व मत्सरही उत्पन्न होतो. स्वतःला इप्सित भोग न मिळाल्यापेक्षाही दुसऱ्याला तो मिळाला याचे दुःख माणसाला जास्त होते.

म्हणून गीतेतील वरील श्लोकात इच्छा-द्वेष या जोडगोळीचा उल्लेख आला आहे. या जोडगोळीमुळेच मनुष्य द्वंद्वमोहात अडकून बसतो व त्यामुळे तो परमार्थ मार्गावरून च्युत होतो असे येथे सुचवावयाचे आहे.

आता या श्लोकावर ज्ञानोबांनी काय ओव्या रचल्या आहेत ते पहा.

इच्छा कशी उत्पन्न होते व पुढे इच्छाद्वेषांची जोडी जमून द्वंद्व मोह कसा निर्माण होतो व पुढे अहंकाराने (आजोबाने) केलेल्या लाडामुळे व आशोचे दूध पिऊन तो कसा बलदंड होतो व विकृतीच्या सहाय्याने तो अंती माणसाला परमार्थापासून दूर खेचून निषिद्ध कर्म मार्गाला कसा लावतो, याचे वर्णन करण्यासाठी एक फार सुंदर रुपक रंगविले आहे.

या गीतेच्या श्लोकावर (विवरणात्मक) ज्ञानोबांनी खालील सात ओव्या रचल्या आहेत.

**तरी तेचि आता थोडिसी। गोठी सांगिजेल परियेसी।**
**जें अहंकारा तनूंसी। [1]वालभ पाहिले।।१६५।।**

**तेथ इच्छा हे कुमारी जाली। मग ते कामाचिया तारुण्या आली।**
**तेथे द्वेषेंसी मांडिली। [2]वराडिक ।।१६६।।**

**तया दोघांस्तव जन्मला। ऐसा द्वंद्वमोह जाला।**
**मग ते आजेयाने वाढविला। अहंकारें।।१६७।।**

**जो धृतीसि सदा प्रतिकुळु। नियमाही नागवे सळु।**
**आशारसें दोंदिलु। जाला सांता।।१६८।।**

**असंतुष्टीचिया मदिरा। मत्त होवोनी धनुर्धरा।**
**विषयाचे [3]बोबरां। विकृतीसीं।।१६९।।**

**तेणे भावशुद्धीचिया वाटे। विखुरले विकल्पाचे कांटे।**
**मग [4]चिरिले अव्हांटे। अप्रवृत्तीचे ।।१७०।।**

**तेणे भूतें भांबावली। म्हणोनि संसाराचिया [5]आडवामाजीं पडिलीं।**
**मग महादुःखाच्या घेतली। [6]दांडेवरी।।१७१।।**

१-प्रेम, २-विवाहसंबंध,३-महाहात, ४-खुले केले, ५-रानांत, ६-दांड्याने चेपले गेले.

ज्ञानेश्वरीची ७०० वर्षापूर्वीची (प्राकृत) मराठी भाषा आजच्या वाचकांना काहीशी

दुर्बोध वाटणे सहाजिक आहे. म्हणून वाचकांच्या सोयीसाठी 'अनुष्टुप ज्ञानेश्वरी' या ग्रंथातील वरील ओव्यांचे हल्लीच्या मराठीतले अनुष्टुप श्लोकांतले भाषांतर खाली देत आहे.

**थोडक्यात सांगतो ऐका संसाराची अशी कथा।**
**अहंकार नि कायेचे जमले प्रेम एकदा।।१६५।।**

**मीलनीं मुलगी त्यांना 'इच्छा' नामेंच जन्मली।**
**यौवनात चि येताची 'द्वेषा'शी लग्न ती करी।।१६६।।**

**इच्छा द्वेष विवाहान्ती 'द्वंद्वमोह' चि जन्मला।**
**अहंकार चि आजाने लेकरा त्याच पोषिला।।१६७।।**

**धृतीचा बनला शत्रू निग्रहास जुमानिना।**
**आशेच्याच दुधाने हा दांडगा लठ्ठ जाहला।।१६८।।**

**असंतोषाच्याच मद्याने धुंद होऊनि तो तरी।।**
**विषयांच्या महालीं तो विकृती-संगची करी।१६९।।**

**विकल्पांच्याच काट्यांनी आडवी धर्म-मार्ग हा।**
**निषिद्ध कर्ममार्गांना खुले मात्र करीच हा ।।१७०।।**

**द्वंद्वमोहप्रभावेंची भांबावतीच जीव हे।**
**पडले जणु रानांत दुःखभारेंच चेंपले।।१७१।।**

आता या ज्ञानोबांनी योजलेल्या दीर्घ रुपकाचे रसग्रहण करु या.

गीता 'इच्छा-द्वेष यांच्या जोडीनेच सुरुवात करून या जोडीने निर्मिलेला द्वंद्वमोह माणसाला मोहात पाडून मोक्षमार्गावरून खेचून निषिद्ध मार्गावर घेऊन जातो' असे सांगते. ज्ञानोबा मात्र अहंकार आणि विषयांकडे धावणाऱ्या पंचेन्द्रियांनी युक्त अशा कायेच्या प्रेम मीलनातून 'इच्छा' नावाची मुलगी जन्माला येते. अशी त्यांच्या दीर्घ रुपकाला सुरुवात करतात.

वस्तुभोगांची इच्छा ही न शमणारी गोष्ट असून इप्सित वस्तू मिळाल्यावरसुद्धा ती वाढतच जाते. इप्सित वस्तू न मिळाल्यास व ती दुसऱ्याला मिळाल्यास माणसाच्या मनांत द्वेष-मत्सरासारखे विकार उत्पन्न होतात, हे सत्य ज्ञानोबा, इच्छा यौवनात आल्यावर ती द्वेषाशी लग्न करते असे सांगून आपले रुपक एक पायरीने पुढे नेतात. इच्छा-द्वेष या जोडगोळीमुळे द्वंद्वमोह निर्माण होतो हा गीतेतला आशय, ज्ञानोबा तेच रुपक पुढे नेऊन इच्छा-द्वेषांच्या पोटी (त्यांचे लग्न झाल्यावर) द्वंद्व मोह नावाचा मुलगा जन्माला येतो असे सांगतात. फाजील महत्त्वाकांक्षेपायी मनुष्य आपल्याला अप्राप्य असलेल्या गोष्टी प्राप्त करण्याची 'आशा' धरतो आणि त्यामुळे द्वंद्वमोह बलवत्तर होऊन माणसाला सहज मोहग्रस्त करतो हा घटनाक्रम, ज्ञानोबा आपल्या रुपकात कसा खुबीने बसवतात हे पाहून आपण थक्क होऊन जातो. इच्छा द्वंद्वमोहाला (आपल्या मुलाला) आशेचे स्तन्य पाजते आणि अहंकार (द्वंद्वमोहाचा आजोबा) त्याचे फाजील कोडकौतुक करतो आणि त्यामुळे द्वंद्वमोह हा आणखीनच पुष्ट आणि बलवत्तर होतो, असे वर्णन करून ज्ञानोबा आपले रुपक पुढे नेतात.

इच्छा-द्वेषांच्या विकारांमुळे माणसाचे मन अस्वस्थ व अशांत राहाते, अशा धुंदीमुळे ‘माणसाची सदसद्‌बुद्धी विलय पावून तो विषयभोगांच्या आहारी जातो व मनांतील विकल्पांमुळे सन्मार्ग सोडून तो निषिद्ध मार्गाकडे आकर्षित होतो’, ही प्रक्रिया ज्ञानोबा आपल्या रुपकात शेवटी कशी वर्णन करतात ते पहा! ते म्हणतात,‘हा बलवत्तर द्वंद्वमोह असंतोषाच्या मद्याने धुंद होऊन, विषयांच्या महालात विकृतीशी संग करतो आणि त्या परिणामीं धर्ममार्गावर हा असंतोषाचे काटे पसरवतो व निषिद्ध मार्गावर माणसाला अनायासे घेऊन जातो.’

ज्ञानोबा शेवटी निष्कर्ष काढतात की, या द्वंद्वप्रभावाने भांबावलेल्या माणसाची अवस्था भर रानांत वाट चुकलेल्या माणसारखी होते.

‘सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी’ या ग्रंथासाठी, गीतेच्या ७ व्या अध्यायाच्या २७ व्या श्लोकावरील ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा अनुवाद करत असताना मला जो अनोखा आनंद अनुभवास मिळाला त्याची थोडिशी चुणूक तरी वाचकांना अनुभवावयास मिळावी म्हणून हा प्रपंच!

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

●●●

## *खर्च किती करावा. . .*

**आयाच्चतुर्थभागेन व्ययकर्म प्रवर्तयेत्।**
**प्रभूत तैल दीपो हि चिरं भद्राणि पश्याति॥**

आय म्हणजे उत्पन्न त्याच्या चतुर्थांशानें व्यय-खर्च करावा.

तेल भरपूर असलेला दिवा चिरकाल प्रकाश देऊं शकतो. मांगल्याचें दर्शन घडवितो.

देवाचें मंगल सतत दर्शन घडावें म्हणून नंदादीप लावीत असतों. रात्रभर टिकावा म्हणून समई (नंदादीप) लावायची तर तिची तेल धारण करण्याची क्षमता लक्षांत घेऊन त्यानुसार एक वा दोन वाती प्रज्वलित ठेवाव्या म्हणजे नंदादीप रात्रभर अखंड तेवत राहील. जास्त वाती प्रज्वलित केल्यावर तेल लौकर संपून नंदादीप विझून जाईल.

कुटुंबप्रमुखानें आय आणि व्यय यांच्यात तालमेळ ठेवलाच पाहिजे. एक चतुर्थांश नित्य खर्चाकरतां, दोन चतुर्थांश नैमित्तिक (कपडालत्ता, शिक्षण वगैरे) खर्चाकरतां आणि बाकीचा एक चतुर्थांश आकस्मिक खर्चाकरतां शिल्लक ठेवावा.

●●●

मागील लेखात राजाच्या दृष्टीने आदर्श दैनंदिन व्यवहाराविषयी कौटिल्याच्या मतांचा सविस्तर परामर्श घेतला. कार्यक्षमता वृद्धिंगत करण्यासाठी दैनंदिन वेळापत्रक आवश्यक आहे पण तत्पूर्वी राजाची सुरक्षितता अधिक महत्त्वाची. राजा सुरक्षित असेल तर राज्यकारभारादी कामे करू शकेल आणि राज्यरथ न अडखळता चालेल. शतावधानी कौटिल्याने अर्थातच राजाच्या सुरक्षिततेचा विचारही केला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने राजाच्या प्रासादात काम करणार्यांच्या नेमणूका, या नेमणूकांचे निकष आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने दररोज घेण्याची काळजी इत्यादी अनेक बाबींचा विचार 'निशान्तप्रणिधि' आणि 'आत्मरक्षितकम्' या प्रकरणांत पुढीलप्रमाणे केला आहे.

राजाच्या सुरक्षिततेचा विषय राजाच्या निवासस्थानाच्या विचारापासून सुरू होतो.

राजाचे निवासस्थान आणि सुरक्षा - वास्तुशास्त्रात प्रवीण असलेल्या लोकांनी निवडलेल्या जागी तट, खंदक, दरवाजे आणि सभोवती महाल असलेले अंत:पुर राजाने बांधून घ्यावे. या निवासस्थानामध्ये गुप्त भिंती व वाटा असलेली भुलभुलैयाची रचना असावी. त्यांत अनेक भुयारी वाटा असलेले तळघर असावे. भिंतीत गुप्त जिने अथवा पोकळ खांबांतून आत जाण्याचे आणि बाहेर पडण्याचे मार्ग असावेत. प्रासादात जमीन पाडता येईल अशी यंत्रे बसवलेली असावीत. संकटाला प्रतिकार करता येण्याच्या दृष्टीने अशा प्रकारचे निवासस्थान बांधून घ्यावे. सहकार्यांना या पद्धती माहित असतील तर याहून वेगळ्या पद्धतीने गृहरचना करावी. मात्र ती सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य असावी जेणे करून राजा सुरक्षित राहील.

वास्तू अग्नी, विष आणि सर्पादी संकटांपासूनही संरक्षित असणे आवश्यक आहे. यासाठी कौटिल्याने विविध उपाय सांगितले आहेत जसे वास्तुभोवती विशिष्ट वनस्पतींचा वापर किंवा मोर, मुंगुस इत्यादी सर्पशत्रू असलेल्या प्राण्यांचे आणि सापादी प्राण्यांच्या अस्तित्वाची सूचना देणार्या; पोपट, मैना यांसारख्या पक्ष्यांचे पालन करायला सांगितले आहे.

सुरक्षिततेच्या दृष्टीने राजाच्या नातलगांची निवासस्थानेही राजाच्या प्रासादापासून काही अंतरावर असावीत. राजाच्या निवासस्थानाच्या पाठीमागे स्त्रियांसाठी महाल, प्रसूतिगृह, आजार्यांसाठी दालने आणि वृक्ष, पुष्करणींसाठी जागा असावी. त्यापलिकडे राजकन्या आणि राजकुमारांसाठी निवासस्थाने असावीत. राजाच्या निवासस्थानाच्या पुढील बाजूस वस्त्रालंकार घालण्यासाठी खोली, सल्लामसलतीची खोली, दिवाणखाना असावा. राजगृहाच्या बाजूला मोकळ्या जागेत रक्षक असावेत.

राजाचे नातेवाईक आणि सुरक्षा - बाहेरच्या व्यक्तींपासून राजाला सावध राहावे आवश्यक आहेच पण कौटिल्याने अगदी निकटवर्तीय व्यक्तींपासून म्हणजे राण्यांपासूनही सावध राहायला सांगितले आहे. वृद्ध स्त्रियांनी शुद्धतेविषयी परीक्षा केल्यावरच राणीला भेटावे असे म्हटले आहे. निकटवर्तीय नातलगांच्या साहाय्याने, खाद्यपदार्थांतून अथवा दागिन्यांमध्ये लपवलेल्या शस्त्रांनी अशा विविध प्रकारांनी राजांचे घात केलेल्या राण्यांचे इतिहासातील दाखले कौटिल्याने दिले आहेत. राण्यांना सर्व लोकांशी संपर्क ठेवण्यासही प्रतिबंध होता असे दिसते. एकंदरीत राजाने स्वत:शिवाय इतर कुणावरही विश्र्वास ठेऊ नये अगदी राणी अथवा राजपुत्रावरही नाही असे कौटिल्य सुचवतो.

सुरक्षेच्या दृष्टीने राजप्रासादातील व्यक्तींच्या विहारावरही अंशत: निर्बंध असल्याचे दिसते. म्हणूनच राजवाड्यातील व्यक्तींनी आपापल्या जागीच राहावे, बाहेरच्या व्यक्तींशी संपर्क ठेऊ नये असे कौटिल्य म्हणतो. कोणताही पदार्थ त्याची परीक्षा केल्यावर, त्याचा आत प्रवेश अथवा बाहेर जाण्याची नोंद केल्यावर, मोहोरबंद करून स्वीकारावा अथवा बाहेर पाठवावा.

राजाचे दैनंदिन व्यवहार आणि सुरक्षा - राजाच्या दैनंदिन वेळापत्रकातही लहानसहान गोष्टींबाबत अतिदक्षता पाळली जावी असे कौटिल्याचे मत होते असे दिसते. राजा सकाळी उठल्यापासून त्याच्या प्रत्येक कार्यासाठी म्हणजे वस्त्र, अलंकार धारण करणे अशा कार्यांसाठीही विविध वर्गांच्या सेवकांची नेमणूक केलेली दिसते. पिता, पितामहांपासून वंशपरंपरेने सेवेत असलेल्या, नात्यांनी जोडलेल्या, सुशिक्षित, कर्तृत्ववान व्यक्तींनाच राजाने जवळ करावे. द्रव्य आणि मान यांनी सत्कार न केलेल्या तसेच अपकार करून नंतर मेहेरबानी केलेल्या आपल्या देशवासीयाला देखील राजाने जवळ करू नये.

अन्नसुरक्षा - मुदपाकखान्यावरील अध्यक्षाने सुरक्षित ठिकाणी अन्नसिद्धी करावी. अन्न विषयुक्त नसल्याची खात्री करून घ्यावी. विषयुक्त अन्न ओळखण्याचे अनेक निकष कौटिल्याने सांगितले आहेत. विषप्रयोग करणाऱ्यांची लक्षणेही कौटिल्य सांगतो, जसे बोलताना अडखळणे, कंप सुटणे इत्यादी. अन्नातून विषप्रयोग करणे सोपे असते त्यामुळे अन्नाविषयी सर्वाधिक खबरदारी घेण्याचे कौटिल्य सुचवतो.

वस्त्रालंकार-प्रसाधन-विहारादी सुरक्षा - न्हावी तसेच पोषाख चढवणार्यांनी शुचिर्भूत होऊन, शुद्ध वस्त्र परिधान करून आणि महत्त्वाचे म्हणजे राजप्रासादातील रक्षकांकडून मोहोरबंद उपकरणे घेऊन त्यांचा वापर करावा.

स्नान घालणे, संवाहन करणे, कपडे धुणे, माळा गुंफणे इत्यादी कामे विश्वासू दासी व त्यांच्या देखरेखीखाली कारागिरांनी करावी. स्नानासाठी वापरायचे चूर्ण, उटणे, सुवासिक द्रव्ये सेवकांनी प्रथम स्वत:च्या बाहूंवर लावावे आणि नंतर राजासाठी वापरावे. इतर कुणाकडून आलेल्या पदार्थांविषयीदेखील हीच

काळजी घ्यावी.

नट नर्तक आदींनी देखील अग्नी, शस्त्र, विष इत्यादींचा उपयोग असलेले खेळ वर्ज्य करून राजाचे मनोरंजन करावे. वाद्य व इतर साहित्य राजवाड्यातच ठेवावे. विश्वासू सेवकांच्या ताब्यात असलेल्या वाहनांवरच राजाने आरूढ व्हावे, विश्वासू नावाड्याच्या नावेतच बसावे. पाण्याच्या काठावर सैन्य सज्ज ठेवावे.

मासेमाऱ्यांनी तपासून सुरक्षित केलेल्या तलावातच राजाने जलतरणासाठी उतरावे, सर्प पकडणार्यांनी निर्भय केलेल्या उद्यानात विहार करावा आणि पारध्यांनी, चोर, वन्य पशुंपासून सुरक्षित केलेल्या वनात मृगयेसाठी जावे. विश्र्वासू रक्षकांसह तापसांची भेट घ्यावी. सशस्त्र सैन्याची पाहाणी शस्त्रसज्ज होऊन आणि घोड्यावर किंवा हत्तीवर आरूढ होऊन करावी. बाहेर जाताना राजमार्गावर रक्षकांची व्यवस्था करावी. माणसांच्या गर्दीत शिरू नये. जत्रा, सण, मेळावे अशा ठिकाणीही देखरेखीची व्यवस्था करूनच जावे. अशारीतीने राजाने सर्वप्रकारे, सर्व धोक्यांपासून स्वत:चे संरक्षण करावे.

कौटिल्याने, राजाने स्वत: आणि त्याच्या सेवकांनी राजाच्या सुरक्षिततेविषयी घ्यायची खबरदारी या प्रकरणांत सांगितली आहे. यांत सांगितलेले सुरक्षानियम तसे पाहाता प्रातिनिधिक स्वरूपाचे आहेत कारण इतर अनेक बाबतीतही राजाची सुरक्षा महत्त्वाची असते. परंतु राजकारणविषयक इतर अनेक विषय हाताळणाऱ्या या ग्रंथात राजाच्या सुरक्षेविषयीचे सर्व मुद्दे मांडणे विस्तारभयामुळे कठीण आहे. मात्र राजा या अतिमहत्त्वाच्या आणि राज्याच्या घटकांपैकी सर्वाधिक महत्त्वाच्या आणि आद्य घटकाच्या सुरक्षेचा विचार या प्रकरणांत नेमकेपणाने ठसवला जातो.

उघड असलेल्या बाह्य शत्रूसह दोन हात करणे सोपे असते परंतु अंतर्गत छुप्या शत्रूला ओळखणे दुरापास्त. हितचिंतक म्हणून वावरणारा अंतर्गत शत्रू अधिक धोकादायक असत. त्यापासून रक्षण करण्यासाठी वर वर्णन केलेली सर्व सुरक्षा व्यवस्था प्रामुख्याने आवश्यक असते. अंतर्गत शत्रुंमुळे, योग्य सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे किंवा राज्यकर्त्यांनी योग्य खबरदारी न घेतल्यामुळे बळी गेलेल्या नेत्यांचे दाखले अलिकडील इतिहासातही आहेत. लोकशाही राज्यपद्धती असो वा राजेशाही राष्ट्रप्रमुखाची सुरक्षा हा विषय सार्वकालिक आणि सार्वत्रिक आहे. कौटिल्याला याचे नेमके भान आहे हेच या विवेचनावरून दृष्टोत्पत्तीस येते.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ
नगर, तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

•••

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**
वैद्यक, आणि गणिती ग्रंथही भाषांतरीत झाल्याची नोंद त्या काळात मिळते.

यामुळेच ५ व्या शतकात इराणमधील गुंडीशापूरची ओळख हे विद्येचे माहेरघर (House of Wisdom) म्हणून होत होती. पुढे काही शतकांनी हे विद्येचे माहेरघर सध्याची इराकची राजधानी बगदाद येथे स्थलांतरीत झाले. पुढील काही शतकं तिथेही ग्रीक विज्ञान, आणि तत्त्वज्ञानाच्या ग्रंथाप्रमाणेच हिंदू गणिताचे ग्रंथ, पर्शियन व अरेबिक भाषांमध्ये भाषांतरीत व्हायला लागले. इराणमधील गुंडीशापूर, किंवा इराकमधील बगदाद मधील हे ज्ञानाचे आदानप्रदान अत्यंत उदार व उत्साहवर्धक वातावरणात होत होते. दुर्दैवाने इस्लामचा प्रभाव वाढलेल्या या देशामधील ती सहिष्णुता पुढे जवळजवळ नाहिशी झाली.

सिरिया, स्पेन, पोर्तुगाल ही एकेकाळची ख्रिश्चन धर्मीय राष्ट्र इस्लामच्या प्रभावाखाली आली होती. त्या राष्ट्रांना परत ख्रिस्ती करण्याकरता ११, १२ व १३ व्या शतकामध्ये ख्रिश्चन व इस्लाम पंथीयांमध्ये मोठ्या प्रमाणावर धर्मयुद्ध (Crusades) झाली. स्पेन व पोर्तुगाल परत ख्रिश्चन झाली. या धुमश्चक्रीमध्ये दोन्ही बाजूंकडून त्यांची ग्रंथालयं जाळली जावू लागली. याचवेळी सुमारे १२ व्या शतकाच्या आतबाहेर स्पेनमधून काही वैज्ञानिक पर्शियन व अरेबिक ग्रंथ लॅटीन भाषेत भाषांतरीत होत होते.

१२ ते १५ वे शतक हे युरोपकरता प्रबोधन पूर्व युग होते. युरोपचा मूळ ग्रीक भाषेशी संबंध केव्हाच तुटला होता. पण यातले अनेक ग्रंथ ५ ते १२ शतकापर्यंत पर्शियन किंवा अरेबिक भाषांमध्ये भाषांतरीत झाले होते. युरोप आपल्या संस्कृतीचे स्त्रोत रोमन व ग्रीक संस्कृतीमध्ये असल्याचेच मानत होता. अरबांकडून भाषांतरीत ग्रीक विज्ञान व साहित्य घेण्याऐवजी पुन्हा एकदा ग्रीक शिकण्याची चळवळ युरोपमध्ये सुरुवात झाली. पर्शियन विज्ञान ग्रंथांची तर लॅटीनमध्ये भाषांतर झालीच, पण प्लेटो, ॲरिस्टॉटल, आर्किमिडीज यांच्या ग्रंथाचेही पुन्हा लॅटीन व पुढे इंग्रजीत भाषांतर व्हायला लागली. पुन्हा आपल्या मुळ संस्कृतीकडे जाण्याची प्रक्रीया म्हणजे रनेसाँ (Renaissaince) युगाचा प्रारंभ १२ व्या १३ व्या शतकात झाला असला, तरी तिने बाळसं मात्र १५ व्या शतकात धरल. परंपरागत बायबल केंद्रित सृष्टीच्या निर्मितीच्या भाकडकथांना प्रथमच आव्हान मिळायला लागले.

ही पार्श्वभूमी कळल्याशिवाय, 'विज्ञान' आणि 'धर्म' यामधील परस्परविरोधी भूमिका, आणि त्याची विरोधाची परंपरा लक्षात येणे शक्य नाही.

युरोपमधील पुढच्या वैज्ञानिक क्रांतीचे स्वरुप हे संपूर्णतः भिन्न आहे. चर्चच्या विचाराच्या परिघाबाहेर जावून या वैज्ञानिकांना विचार करावा लागत होता. सहाजिकच त्याची सुरुवात कोपर्निकस (१४७३-१५४३) पासून होते. सृष्टीच्या निर्मितीची बायबल सम्मत भूकेंद्रित संकल्पना

कोपर्निकसनी मोडीत काढली, व सूर्यकेंद्रीत सिद्धांत मांडला. पृथ्वी आपल्या स्वतःभोवती फिरते हा सिद्धांत ६ व्या शतकातच आर्यभटांनी भारतात मांडला होता.

कोपर्निकस पाठोपाठ त्याच्याच सिद्धांताचा आधार घेत गॅलीलीओ (१५६४-१६४२), ब्रूनो (१५४८-१६००) आणि केप्लर (१५७१- १६३०) यांनी ग्रहगणितामध्ये क्रांतीकारक सिद्धांत मांडले. अर्थातच या सगळ्यांना चर्चबरोबर संघर्ष करायला लागला. ब्रूनोला तर जीवंत जाळण्यात आले.

पाश्चात्य धर्म म्हणजे ख्रिश्चॅनीटी, आणि विज्ञान यांच्या परस्पर संबंधांची ही पार्श्वभूमी आहे. भारतातील धर्म आणि विज्ञानाच्या परस्पर संबंधाची पार्श्वभूमी सर्वथा भिन्न आहे. त्यांचे सांस्कृतिक संदर्भही संपूर्णतः भिन्न आहे.

६ व्या शतकातील आर्यभट्ट, पुढे ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य-१, १० व्या शतकातील श्रीपती, १२ व्या शतकातील भास्कराचार्य-२, ते १५ व्या शतकातील गणिती गणेश दैवज्ञ यांनीही ग्रहगणितामध्ये सातत्याने सुमारे १००० वर्ष नवनवीन सिद्धांत मांडले. आपल्या पूर्वसुरींच्या काही सिद्धांताच्या बाबतीत त्यांची असहमतीही होती. तरीही यापैकी कोणालाही त्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाकरता समाजबाह्य व्हायला लागले नाही. १५ व्या शतकातील गणिततज्ज्ञ गणेश दैवज्ञ याचा अभ्यास तर त्याचे गाव 'नंदीग्राम'च्या देवळामध्ये होत होता.

गणिता इतकाच, कामशास्त्रावरील वात्स्यायनाचा ग्रंथ हाही विद्यापीठामधून अभ्यासला जात होता. १३ व्या शतकामध्ये यशोधन यांनी 'जयमंगला' नावाची कामसूत्रावरील टीका लिहिली आहे; २ ऱ्या शतकातील भरताचे नाट्यशास्त्र हाही असाच रसिकांच्या पसंतीला उतरलेला एक ग्रंथ. अभिनवगुप्ताने (९५० ते १०१६) १० व्या शतकात नाट्यशास्त्रावर 'अभिनवभारती' नावाची टीका लिहिली. काश्मिरपासून, कन्याकुमारीपर्यंतच्या मंदिरांच्या अनेक हस्तलिखित संग्रहामध्ये हे सर्व मूळ ग्रंथ व त्यावरील टीका लीलतया मिळतात. वास्तुशास्त्रापासून, नौकानयनापर्यंतचे अनेक वैज्ञानिक ग्रंथही याच काळात भारतात लिहिले गेले व त्यांचा प्रत्यक्ष मंदिर बांधण्यापासून, नौका बनवण्यापर्यंत उपयोग होत होता.

कापेर्निकसनंतर पाश्चिमात्य विज्ञानातला आणखीन एक क्रांतीकारक सिद्धांत चार्ल्स डार्विनने (१८०९ ते १८८२) १८५९ साली लिहिलेल्या आपल्या Origin of Species या पुस्तकातून मांडला. त्यानंतर निर्माण झालेले जैवशास्त्र व त्याच्या विविध शाखांचा पाया म्हणजे डार्विनचा उत्क्रांतीवाद आहे. सहाजिकच चर्चनी त्याला कडाडून विरोध केला, कारण सृष्टीनिर्मितीचे सर्वच ख्रिश्चन सिद्धांत यामुळे कोलमडून पडले. हे पुस्तक प्रकाशित झाल्यावर अवघ्या सात महिन्यात ऑक्सफर्ड येथील ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नॅचरल हिस्ट्री म्यूझियममध्ये, प्रसिद्ध विचारवंत थॉमस हक्स्ले आणि बिशप सॅम्यूअल विल्बरफोर्स यांच्यामध्ये कडाक्याचा

वाद झाला. दोन्ही बाजूंनी ऑक्सफर्डमधील विचारवंत व धर्ममार्तंड हजर होते. सध्या आपण २१ व्या शतकात आहोत, तरीही आज चर्चचा डार्विनच्या उत्क्रांतीवादाला विरोध आहे. डार्विनच्या सिद्धांताप्रमाणे सर्व प्राणीमात्रांची निर्मिती ही एकपेशिय जीवापासून, बहुपेशिय मानवापर्यंत झाली आहे. सगळंच प्राणी जगत, हे कुठल्यातरी उत्क्रांतीच्या मार्गावरील टप्पे आहेत. सहाजिकच ईश्वराने सृष्टी निर्माण केली हा सिद्धांत यामुळे फोलंच नाही तर अवैज्ञानिकही ठरतो. युरोपमध्ये व अमेरिकेतून कित्येक शाळांमधून उत्कांतीवादाबरोबरच आजही सृष्टीची निर्मिती ही ईश्वरेच्छेप्रमाणे झाली (Creationism) हा पर्यायी सिद्धांत म्हणून शिकवायला लागतो.

१९७८ साली आणखिन एक क्रांतीकारक पाऊल विज्ञानाने टाकले, ते म्हणजे कृत्रिम गर्भधारणेचे (In-Vitro Fertilization -IVF). हजारो वर्ष, मानवाची निर्मिती ही स्त्रीपुरुष मिलनातून होते. शास्त्रज्ञांनी 'स्त्री' आणि 'पुरुष' गन्तुक (Gamete) यांचे शरीराबाहेर मीलन घडवून गर्भधारणा केली. हा गर्भ जसा वाढू लागतो तसा तो पुन्हा स्त्रीच्या गर्भाशयामध्ये रोपण करण्यात येतो. वंधत्व किंवा तत्सम व्याधींमुळे ज्या स्त्रीपुरुषांना अपत्य होवू शकत नाही अशा हजारो स्त्री पुरुषांना या वैज्ञानिक संशोधनामुळे अपत्य होऊ शकते. या संशोधनाला व वैद्यकीय प्रक्रियेलाही चर्चने कडाडून विरोध केला होता.

आज विज्ञानाची ही घोडदौड जनुकांच्या रचनेपर्यंत येवून पोहचली आहे. आधुनिक अनुवंशशास्त्राचे जनकत्व ग्रेगॉर मेंडेल (१८२२ – १८८४) या वैज्ञानिकाला मिळते. वनस्पतीशास्त्रामध्ये संशोधन करून त्यानी अनुवांशिकतेचा सिद्धांत मांडला. पेशीच्या प्रकलामध्ये (nucleus) रंगसूत्र (Chromosomes) असतात, व रंगसूत्रांमध्ये जनुक (Genes) असतात. आपल्या सर्वच शरीररचना, व अनुवंशिकतेचे सूत्र या जनुकांमध्ये आहे. अगदी अलीकडे म्हणजे २०१५ साली वैज्ञानिकांनी CRISPR हे असं साधन निर्माण केले कि, त्यामुळे जनुकांच्या शृंखलेत हस्तक्षेप (Gene editing) करता येऊ लागला. यामुळे काही असाध्य अनुवंशिक रोगावरती नियंत्रण मिळवणे शक्य होणार आहे. सहाजिकच या हस्तक्षेपालाही ख्रिस्ती धर्माचा विरोध आहे.

नुकतंच एक चिनी शास्त्रज्ञ, (He Jiankui) ही जनकुई यांनी CRISPR च्या सहाय्याने जनुकशृंखलेत हस्तक्षेप करून दोन जुळ्या बहिणींना जन्माला घातले. यामुळे जगातले सगळेच या क्षेत्रातील वैज्ञानिक खडबडून जागे झाले. हा शोध कितीही क्रांतीकारक असला तरीही या प्रक्रीयेच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या गर्भाच्या सुरक्षितेबद्दल पुरेसं संशोधन आज झालेलं नाही. यामुळे अनेक सामाजिक आणि नैतिक प्रश्नही उभे राहण्याची शक्यता आहे. म्हणून यांची वारंवार तपासणी करून त्यांच्या सुरक्षितेबद्दल संपूर्ण खात्री होईपर्यंत असे प्रयोग करू नयेत असे संशोधकांचही मत

आहे. त्यामागील कारणेही वैज्ञानिक आहेत. हे सर्वच संशोधन नवीन असल्यामुळे आज त्यावर मोठ्या प्रमाणात चर्चा चालू आहे. चर्चेचा या संशोधनालाही विरोध आहे.

वरच्या विवेचनावरून आपल्याला एक गोष्ट लक्षात येईल की, विज्ञानाला प्रखर विरोध झाला तो ख्रिस्ती धर्मसंस्थेकडून. भारतामध्ये पूर्वी आणि आजही वर उल्लेखलेल्या कुठल्याही सिद्धांताना किंवा प्रयोगांना कधीही धर्मसत्तेकडून विरोध झाला नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे भारताची धर्म संकल्पना ही फक्त उपासनाकेंद्री नाही. दुर्दैवाने, विज्ञान आणि धर्माचा विचार करतांना, पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये तसा विरोध अस्तित्वात आहे, म्हणजे आमच्याकडेही तसा तो असणारच, हे गृहीतक अनेक चांगल्या विचारवंतांनीही अंगिकारलेले दिसते.

१६ व्या शतकापर्यंत जो भारतीय गणितामध्ये प्रचंड कल्पकता दाखवत होता, तो गेल्या ३००-४०० वर्ष तशी का दाखवू शकत नाही, याची कारणे त्याच्या धर्मापेक्षा, वसाहतवादामध्ये शोधावी लागतील. २० व्या शतकाच्या पूर्वार्धातील थोर गणिती श्रीनिवास रामानुजन हे देवीचे भक्त होते. त्यांच्या धर्मश्रद्धा गणितातील त्यांच्या सृजनामध्ये कुठेही उणेपण आणू शकल्या नाहीत. हे एकच उदाहरण भारतामध्ये 'विज्ञान' आणि 'धर्म' यांचा संबंध हा मारक तर नाही, पण पूरक आहे हे दाखवायला पुरेसा आहे.

विज्ञानालाही आपला धर्म असतो, आणि धर्माला आपले विज्ञान. कोणाही एकाचा अतिरेक हा घातकच असतो.

•••

**वृत्तपत्र नोंदणी नियमाप्रमाणे (केंद्रीय) 'सद्धर्म' त्रैमासिकाच्या मालकीविषयी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन.**

**१. प्रकाशन स्थळ : लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४०० ६०१**
**२. प्रसिद्धीचा नियत काल : दर चौथ्या महिन्याच्या पहिल्या तारखेस.**
**३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : अनंत विनायक धोरे, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे.**
**४. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : वरीलप्रमाणे.**
**५. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय पत्ता वरील प्रमाणे.**
**६. एकूण भांडवलाच्या १ टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदार व्यक्तीसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवे : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट. पत्ता वरीलप्रमाणे.**
**मी अनंत विनायक धोरे, जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे.**

**सही - अनंत विनायक धोरे**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१